श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

स्थापना : १९६०

नॅक द्वारा प्रमाणीत 'बी'



# विद्या

वार्षिकांक : २०१८-१९

## Science Faculty Meritorious Students




Ku. Pratiksha Rekhate 1st University Merit (2 Gold, 3 Silver Medals & 2 Cash Prizes) in B.Sc. Summer Exam.-2018

## Commerce Faculty Meritorious Students



Ku. Samiksha Nathe 1st University Merit (with 4 Gold Medals) in B.Com. Summer Exam.-2018



**Ku. Nikita Akotkar**
5th Merit in B.Sc.
Summer Exam.-2018



**Ku. Pratiksha Kulut**
9th Merit in B.Sc.
Summer Exam.-2018



**Ku. Shyamal Bhave**
B.Sc.-III (Bio) 1st Prize in
Amravati University Region
GAT Exam.-2019



**Ku. Pratiksha Bhave**
3rd Merit in B.Com.
Summer Exam.-2018



**Ku. Sarla Hiware**
4th Merit in B.Com.
Summer Exam.-2018



**Ku. Kaumudi Dev**
6th Merit in B.Com.
Summer Exam.-2018



**Ku. Rohini Pimple**
7th Merit in B.Com.
Summer Exam.-2018

## Faculty of Arts, M.A. (History) Meritorious Students in Summer Exam.-2018



**Ku. Prachi Ganorkar**
2nd Merit



**Devanand Bhatkar**
3rd Merit



**Pankaj Gawahde**
9th Merit



**Umesh Date**
10th Merit

शिवतिर्थाच्या कणाकणातून । विलसे विमला तवमुर्ती ।।
तुझा निरामय अनंतरुणे । अमूची नमने शत्कोटी ।।

## आमचे प्रेरणास्थान




शिक्षणमहर्षी, कृषिरत्न

**डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख**

**माजी केंद्रीय कृषिमंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली**

**संस्थापक व प्रथमाध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती**




# श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती


## कार्यकारिणी : २०१७-२०२२



**मा. श्री. हर्षवर्धन देशमुख**
अध्यक्ष




**श्री. नरेशचंद्र ठाकरे**
उपाध्यक्ष



**डॉ. रामचंद्र शेळके**
उपाध्यक्ष




**ॲड. गजानन पुंडकर**
उपाध्यक्ष



**श्री. दिलीप इंगोले**
कोषाध्यक्ष



**श्री. हेमंत काळमेघ**
सदस्य



**प्राचार्य केशवराव गावंडे**
सदस्य




**श्री. केशवराव मेतकर**
सदस्य



**ॲड. अशोकराव ठुसे**
सदस्य



**श्री. शेषराव खाडे**
सचिव




**डॉ. वि. गो. ठाकरे**
स्वीकृत सदस्य



**सौ. मिनाक्षी गावंडे**
स्वीकृत सदस्य




**डॉ. पी. एस. वायाळ**
स्वीकृत सदस्य



**श्री. प्रमोद देशमुख**
स्वीकृत सदस्य

## कुशल व्यक्तिमत्व



**मा. श्री. हर्षवर्धनजी प्रतापसिंह देशमुख**

अध्यक्ष

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

# महाविद्यालयाचे प्राचार्य




**डॉ. ए. एल. कुलट**

प्राचार्य

एम.ए. (इंग्रजी), एम.फील., पीएच.डी.

# संपादक मंडळ



प्रा. डॉ. सुनिल पांडे, प्रा. डॉ. संजय कोल्हे, प्राचार्य डॉ. ए. एल. कुलट,
प्रा. डॉ. विलास तायडे व कु. पूजा शिवरकार

# श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

## विद्या वार्षिकांक
## २०१८-१९

* मार्गदर्शक व प्रकाशक *

**डॉ.ए.एल.कुलट**

प्राचार्य, श्री शिवाजी महाविद्यालय, आकोट

* संपादक मंडळ *

**प्रा. डॉ. विलास तायडे**

प्रा.डॉ.संजय कोल्हे

प्रा.डॉ.सुनील पांडे

कु.पुजा शिवरकार

विद्यार्थी प्रतिनिधी

तृतीय वर्ष कला

## श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

## कार्यकारिणी २०१७-२०२२

| | |
|---|---|
| • मा. श्री. हर्षवर्धन प्रतापसिंह देशमुख | अध्यक्ष |
| • मा. श्री. नरेशचंद्र पंजाबराव ठाकरे | उपाध्यक्ष |
| • मा. डॉ. रामचंद्र नारायणराव शेळके | उपाध्यक्ष |
| • मा. ॲड. गजाननराव केशवरावजी पुंडकर | उपाध्यक्ष |
| • मा. श्री. दिलीप भगवंतराव इंगोले | कोषाध्यक्ष |
| • मा. श्री. हेमंत वासुदेवराव काळमेघ | सदस्य |
| • मा. प्राचार्य केशवराव रामकृष्णराव गावंडे | सदस्य |
| • मा. श्री. केशवराव जगन्नाथराव मेतकर | सदस्य |
| • मा. ॲड. अशोकराव उत्तमराव ठुसे | सदस्य |
| • मा. श्री. शेषराव शंकरराव खाडे | सचिव |
| • मा. डॉ. वि. गो. ठाकरे, प्राचार्य | स्विकृत सदस्य |
| • मा. सौ. मिनाक्षी रमेशराव गावंडे, मुख्याध्यापिका | स्विकृत सदस्या |
| • मा. श्री. पी.एस.वायाळ, प्राचार्य | स्विकृत सदस्य |
| • मा.श्री. प्रमोद व्ही.देशमुख, प्राचार्य | स्विकृत सदस्य |

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित,

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

# महाविद्यालय विकास समिती २०१७-२०२२

| | |
|---|---|
| • मा.श्री.हर्षवर्धन प्रतापसिंह देशमुख | अध्यक्ष |
| • मा.श्री.नरेशचंद्र पंजाबराव ठाकरे | सचिव प्रतिनीधी |
| • मा.डॉ.रामचंद्र नारायणराव शेळके | सदस्य |
| • मा.श्री.शशिधरराव श्रीकृष्णराव खोटरे | सदस्य |
| • मा.श्री.ॲड.अनिलभाऊ नामदेवराव पाचडे | सदस्य |
| • मा.श्री.प्रभाकरराव रामकृष्णराव गणगणे | सदस्य |
| • डॉ.अंबादास लक्ष्मणराव कुलट, प्राचार्य | पदसिध्द सचिव |
| • डॉ.सुनील हरीभाऊ पांडे | प्राचार्य नामनिर्देशीत, विभाग प्रमुख प्रतिनिधी |
| • डॉ.कु.माणिक मनोहरराव ढोरे | महिला शिक्षक प्रतिनिधी |
| • डॉ.संजय विठ्ठलराव कोल्हे | शिक्षक प्रतिनिधी |
| • डॉ.प्रशांत प्रल्हादराव कोठे | शिक्षक प्रतिनिधी |
| • प्रा.उमर तमीजोद्दीन भाटी | समन्वयक - आय क्यु ए सी |
| • श्री.शिवाजी सुरेशराव रेळे | विद्यार्थी प्रतिनीधी |

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित,

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट

# कनिष्ठ महाविद्यालय शाळा समिती २०१७-२०२२

| | |
|---|---|
| • मा.श्री. हर्षवर्धन प्रतापसिंह देशमुख | अध्यक्ष |
| • मा.ॲड.श्री. गजाननराव केशवराव पुंडकर | सदस्य |
| • मा.श्री. केशवराव जगन्नाथराव मेतकर | सदस्य |
| • मा.ॲड.श्री. मनोज उत्तमराव खंडारे | सदस्य |
| • मा.श्री. अशोक जनार्दन साबळे | सदस्य, विशेष निमंत्रीत |
| • डॉ.अंबादास लक्ष्मणराव कुलट, प्राचार्य | पदसिध्द सचिव |
| • श्री. विश्वास शालीग्रामजी वसु | शिक्षक प्रतिनिधी |
| • श्री. राज्वल श्रीरामजी पाटील | शिक्षक प्रतिनिधी |
| • श्री. गंगाधर पुंडलीकराव अरबट | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |

# अनुक्रमणिका


- संपादकीय
- प्राचार्यांचे मनोगत

१. सामाजिक चळवळीत तरूणांचा सहभाग — कु. गौरी पुंडकर
२. शेतकरी आत्महत्येची कारणे व उपाय — कु. चैताली अलकरी
३. शिवाजी महाराजांचे तरूणाप्रती विचार — कु. मोनिका माहोरे
४. विद्यार्थी आणि शिस्त — कु. नेहा कदम
५. भ्रष्टाचार — कु. नवदुर्गा खंडेराव
६. डॉ.पंजाबराव देशमुख जीवन व कार्य — कु. रोहिणी गावंडे
७. मुलगी म्हणून मला समाजाशी बोलायचं — कु. स्नेहा बोडखे
८. स्त्री जन्माला नकार नको — कु. पुजा शिवरकार
९. जीवण एक शाळा — कु. प्रतिक्षा शेंडे
१०. महर्षि कर्वे एक कर्ते सुधारक — कु. सोनल शेलोने
११. बेरोजगारी एक समस्या — अब्दुल फारूख अब्दुल खलीक
१२. हुंडा : एक सामाजिक समस्या — कु. साखराबाई पिसाळ
१३. ध्यानसिध्द स्वामी विवेकानंद — कु. योगीता आढे

- काव्य विभाग

१४. शब्द — कु. विद्या बोपुलकर
१५. घर — कु.पुनम गायगोले
१६. चुक — कु.सुवर्णा गावंडे
१७. जीवन — कु.प्रिती देवळे
१८. फक्त तू खचू नकोस — विश्वजित तायडे
१९. मराठी भाषेचे महत्व — मान्यवरांच्या काव्यपंक्तितून
२०. डॉ.भाऊसाहेबांचा गुणगौरव — मान्यवरांच्या लेखणीतून

# संपादकीय ..........

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, आकोट शैक्षणीक सत्र २०१८-१९ मधील 'विद्या वार्षिकांक' आपणा समोर ठेवतांना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे.

१९६० मध्ये स्थापन झालेल्या या महाविद्यालयाला ५८ वर्ष पुर्ण झाली. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहु महाराज यांच्या विचाराने प्रेरित होऊन, त्याच वाटेने वाटचाल करणारे शिक्षण महर्षि डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी या विशाल वटवृक्षाचे बिजारोपन केले.

महाविद्यालयीन वार्षिकांक प्रकाशित करतांना महाविद्यालयातील वर्षभराचा लेखाजोखा प्रकाशित करावयाचा असतो पण त्याच बरोबर महाविद्यालयीन प्रतिमेला वाव देण्याच्या दश्टीने विद्यार्थ्यांच्या लेखन साहित्यासही येथे स्थान दिले आहे. साहित्य म्हणजे समाजाचा आरसा असतो. त्याला वास्तविकतेचा स्पर्श झाला म्हणजे तत्कालीन नानाविध घटना प्रसंग लेखणीतून आकारत असतात. अशा वास्तवतेवर आधारीत साहित्य प्रस्तुत अंकासाठी भरपूर आले पण त्यातील निवडक साहित्यालाच येथे स्थान देता आले.

नवोदितांचे साहित्य लेखन म्हणून त्यांच्या लिखानावर भरपूर संस्कार होण्याची गरज आहे. सातत्याने लेखन करणे हा त्यावरील उपाय आहे. ज्यांचे साहित्य स्विकारले गेले नाही त्यांनी खचुन न जाता लेखन करीत राहावे. निश्चीतच एक दिवस चांगली कलाकश्ती आकारास येईल यात मला तरी शंका वाटत नाही.

म्हणतात ना कोणत्याही वेदनादायक सुरूवातीचा अंत एक यशस्वी कहाणी असते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात सुरूवातीपासूनच 'विद्या वार्षिकांक' काढण्यात येतो. प्रस्तुत अंक वेळेवर प्रकाशीत व्हावा म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.एल.कुलट सरांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. तसेच संपादकीय मंडळातील प्रा.डॉ.विलास तायडे सर, प्रा. डॉ.संजय कोल्हे, प्रा.डॉ.सुनील पांडे सरांनी जे वेळोवेळी मार्गदर्शन केले, सुचना व सहकार्य केले ते मोलाचे होते.

सुबक छपाई प्रिंटींग, बाईडींग इत्यादी तांत्रिक बाबी प्रकाशनात महत्वाच्या असतात. हे कार्य सांभाळणारे आणि त्यांचे सहकारी यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे मी आभारी आहे. तसेच सर्व गुरूजनांचे सहकार्य लाभले म्हणूनच 'विद्या वार्षिकांक' आकारास आला. या सर्वांचे मी आभार मानते आणि माझे संपादकीय संपविते.

♦ विद्यार्थी प्रतिनिधी
**कु. पुजा शिवरकार**
तृतीय वर्ष कला

# प्राचार्यांचे मनोगत........

१९६० साली शेतकऱ्यांनी कापसाच्या गाडीमागे दिलेल्या एक-एक रुपयाच्या देणगीतून २,८१,१११/- या महाविद्यालयाची निर्मिती झाली. केवळ ५७ विद्यार्थ्यांवर सुरू झालेल्या या महाविद्यालयात आज पदवीस्तरावरील कला, वाणिज्य व विज्ञान शाखा आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम, कनिष्ठ महाविद्यालय, उच्च माध्यमिक व्यावसायिक अभ्यासक्रम इत्यादी अभ्यासक्रमातून एकूण **३१०३** विद्यार्थी ज्ञानार्जन करीत आहेत.

महाविद्यालयास सन २०१३ ला CGPA 2.71 असा उच्च प्रतीचा मानांकन प्राप्त झाला आहे. हे महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व कलात्मक गुणांना वाव देण्यासाठी सदैव तत्पर असते. महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या व पारितोषिके प्रदान केली जातात. महाविद्यालयाचे विद्यार्थी तसेच प्राध्यापक, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगीरी करून, महाविद्यालयाचा लौकिक वाढवितात.

यावर्षी उन्हाळी २०१८च्या परीक्षेमध्ये विज्ञान शाखेतील तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु.प्रतिक्षा रेखाते ही संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून प्रथम मेरीट आली तर याच परीक्षेत कु.निकीता आकोटकर पाचवी मेरीट,कु.प्रतिक्षा कुलट नववी मेरीट आली आहे. वाणिज्य शाखेतील तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु.समिक्षा नाथे ही संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून पहिली मेरीट आली तर कु.प्रतिक्षा भावे तिसरी मेरीट, कु.सरला हिवरे चौथी मेरीट, कु.कौमुदी देव सहावी मेरीट तर कु.रोहिणी पिंपळे सातवी मेरीट आली आहे.

कला शाखा पदव्यूत्तर इतिहास विभागातील कु.प्राची गणोरकर द्वितीय मेरीट, देवानंद भटकर तृतीय मेरीट, पंकज गव्हाळे इतिहास नववा मेरीट तर उमेश दाते दहावा मेरीट आला आहे. महाविद्यालयाचे आमचे माजी विद्यार्थी तसेच कु.अश्विनी फोकमारे, एम.एससी. बॉटनी **CSIR NET Life Science,** शुभम राठोड, एम.एससी. बॉटनी **CSIR NET JRF Life Science**, कु.ममता पळसपगार एम.एससी.गणित **NET, SET Mathematical Science,** कु.अर्चना मोहोकार वाणिज्य या विषयात SET परीक्षा उत्तीर्ण झाली आहे.

महाविद्यालयातील प्राध्यापक अध्ययनाबरोबर चर्चासत्र, परिषदा, कार्यशाळा इत्यादी शैक्षणीक उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवितात. यावर्षी आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ.संजय वाघ, डॉ.रवी जुमळे, डॉ.कु.माणिक ढोरे, डॉ.संजय कोल्हे, डॉ.प्रशांत कोठे, डॉ.आर.जी.जाधव, डॉ.व्ही.डी.एलकर, प्रा.कु.स्वाती वैद्य, प्रा.सचिन कोठेकर, प्रा.अनिल सोमवंशी, प्रा.गणेश आंधळे इत्यादींचे शोध निबंध प्रकाशित झाले.

राष्ट्रीय परिषदेमध्ये व जर्नलमध्ये डॉ.विलास तायडे, डॉ.पंजाब पुंडकर, डॉ.अनंत सिरसाट, डॉ.प्रशांत कोठे, डॉ.संतोष कायंदे, प्रा.कु.स्वाती वैद्य, प्रा.सचिन कोठेकर यांचे शोध निबंध प्रकाशित झाले.

यावर्षी मराठी विभागाने 'वागीश्वरी' हस्तलिखीताचा 'उखाने' हा विशेषांक काढला तर 'शब्दवेध' भित्तीपत्रकाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनानिमीत्त 'विचारशलाखा' विशेषांक काढला.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ महानुभाव अभ्यासकेंद्राद्वारे आणि श्री शिवाजी महाविद्यालय मराठी विभागाच्या वतीने 'महानुभाव महिला संताचे योगदान' या विषयावर व्याख्यान व चित्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी विभाग व श्री शिवाजी महाविद्यालय मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २, ३ व ४ फेब्रुवारीला

शहानुर येथे काव्यचर्चेचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी डॉ. विलास तायडे यांचे नारायण सुर्वेंची कविता : स्वरूप आणि समीक्षा हे पुस्तक प्रकाशित झाले आहे.

इतिहास विभाग प्रमुख डॉ.प्रशात कोठे यांचे वऱ्हाडातील नागपुरकर भोसल्यांची कामगीरी हे पुस्तक प्रकाशीत झाले आहे. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने दि. २२ आक्टोबर ते ३० आक्टोबर दरम्यान मतदार नोंदणी अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा.गजानन विरकर व डॉ.संतोष कायंदे यांनी अकोला येथे झालेल्या मतदार साक्षरता समितीमध्ये सक्रीय सहभाग घेतला. डॉ.संतोष कायंदे यांचे ब्रिटन व संयुक्त राज्य अमेरीकेचे शासन आणि सार्क हे पुस्तक प्रकाशीत झाले आहे. डॉ. संजय वाघ यांची नुटा संघटनेच्या जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी तर डॉ. संजय कोल्हे यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रसायनशास्त्र शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षपदी अविरोध निवड झाली.

महाविद्यालयाच्या वाणिज्य विद्या शाखेला अतिशय उज्वल परंपरा लाभली असून या शाखेच्या विद्यार्थ्यांना विशेष शैक्षणीक सुवीधा उपलब्ध करून देण्याकरिता महाविद्यालय विकास निधीतून स्वतंत्र विभाग, वर्गखोल्या तसेच संगणक प्रयोगशाळेकरिता नविन इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. वाणिज्य विद्याशाखेकरिता बांधण्यात आलेल्या नविन इमारतीचे उद्घाटन मा.डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे शुभ हस्ते करण्यात आले असून कार्यक्रमाचे अध यक्ष मा. श्री हर्षवर्धनजी देशमुख, अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती हे होते.

वाणिज्य विभागाच्या वतीने महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा अभ्यिासिका चालविण्यात येत आहे. त्याचे समन्वयक डॉ.सुनील पांडे आहेत. या अभ्यासिकेच्या माध्यमातून आजपर्यंत ४२ विद्यार्थी शासनाच्या विविध विभागामध्ये रूजू झाले आहेत. तसेच अर्थशास्त्र विभागातील श्री चेतन वसु हा विद्यार्थी एम.पी.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण होऊन मुंबई येथे जलसंपदा विभागात मंत्रालयात रूजू झाला आहे.

वाणिज्य विभागाच्या वतीने स्टुडंट बॅकेच्या माध्यमातून गरीब व गरजू विद्यार्थ्यांकरिता कॉलेज ॲडमीशन फी, परीक्षा शुल्क, एस.टी.पासेस, गणवेश आणि पुस्तकांसाठी अल्पमुदतीचे बिनव्याजी कर्ज देण्याकरिता स्टुडंट बॅक सुरू करण्यात आली आहे.

कमवा आणि शिका या योजनेअंतर्गत डॉ.प्रणव कोलते मराठी विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्याकडील रू. १०,०००/- प्राप्त निधीतून दरवर्षी पाच विद्यार्थी कमवा आणि शिका या योजनेचा लाभ घेतात.

महाविद्यालयाचे गंथालय आधुनिक सोईसुविधांनी सुसज्ज असून ग्रंथालयात एकूण पुस्तकांची संख्या ४१,१०२ एवढी आहे. ग्रंथालयात विविध विषयावरील २३ मासिके आणि २३ संशोधन नियतकालीके आहेत. विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनकक्ष आहे. ग्रंथालयाचे संगणकीकरण झाले असून इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे.

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे पथक कार्यरत असून त्याचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अनिल सोमवंशी हे आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून यावर्षी आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा संपन्न झाली. तसेच ॲनेस्थेसिया असोशिएशन अकोला आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने 'जीवन संजीवणी क्रिया' कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत २३ मानवी रबरी पुतळ्यांवर प्रत्यक्ष सराव करून प्रत्येक व्यक्तीला जीवन संजीवणी क्रीयेचे महत्व पटवून दिले. त्यामध्ये एकूण १२१० व्यक्तींनी आपला सहभाग दर्शविला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने अनिल कतोरे बी.ए.भाग-१ याची तेलंगना, निझामाबाद येथे राष्ट्रीय एकात्मता शिबीराकरिता निवड झाली तर सागर लापुरकर बी.ए.भाग-३ या विद्यार्थ्याची राष्ट्रीय प्रजासत्ताक पथसंचालन दिल्लीकरिता निवड

झाली व कलरकोट प्राप्त झाला. यावर्षी विवेक डोहळे वर्ग १२ वी याची दिल्ली येथे संपन्न झालेल्या स्थलसेना कॅम्प करिता निवड झाली असून कलरकोट प्राप्त झाला.

यावर्षी कु.निशा ढोक द्वितीयवर्ष वाणिज्य हिला ४७ किलो वजन गटात कलर प्राप्त झाला. कु. मनिषा भारसाकळे तश्तीयवर्ष कला हिला ५७ किलो वजन गटात कलर प्राप्त झाला. कु. गीता इंगळे तश्तीयवर्ष कला हिला ६३ किलो वजन गटात कलर प्राप्त, कु.रूपाली पाखरे तश्तीयवर्ष कला हिला ४७ किलो वजन गटात कलर प्राप्त या सर्वांची केरळ येथे संपन्न होणाऱ्या आंतर विद्यापीठ स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे. शुभम राऊत वर्ग १२ वा याची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धामध्ये भालाफेक या क्रीडा प्रकारात कराड जि. सातारा करिता निवड करण्यात आली आहे.

महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र असून २१५९ शाळाबाहय विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे कार्य केले जाते.

यावर्षी महाविद्यालयात नुकतीच ७वी शिवाजी विज्ञान परीषद श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती आणि होमीभाभा सेंटर फॉर सायन्स एज्युकेशन यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न झाली. महाविद्यालयात इतर उपक्रमांसाठी विविध मंडळे, समित्या असून त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकासाचा प्रयत्न केला जातो. ग्रामीन भागातील हे महाविद्यालय विद्यार्थी केंद्रीत असून आकोट वासियांचे व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे मा. अध्यक्ष, सर्वपदाधिकारी मंडळीचे मार्गदर्शन लाभत आहे.

आमच्या महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख उंचावत राहो अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे अहवाल वाचन थांबवतो. धन्यवाद!

♦ **डॉ.ए.एल.कुलट**
**प्राचार्य**

# सामाजिक चळवळीत तरूणांचा सहभाग

ज्याप्रमाणे पाचही बोट एकत्र आणल्या नंतरच मुठ तयार होत असते, त्यातील एक बोट जरी कमी असेल तर ती मुठ पुर्ण होणार नाही. ज्याप्रमारे आपल्या हाताचे प्रत्येक बोट हे वेगवेगळया मापाचे असेल तरी त्यांचे काम हे सारखेच असते. त्याचप्रमाणे आपल्या देशातील प्रयेक युवकांमध्ये अशी एक शक्ती आहे जी शक्ती आपल्या सामाजीक चळवळीत अतिशय महत्वाची आहे. प्रत्येक युवा हा या चळवळीचा एक अत्यंत महत्वाचा पाया आहे. तरूणांची शक्ती ही आपल्या देशाला लाभलेली एक देणगी आहे.

आपला देश हा युवकांचा देश म्हणून ओळखला जातो कारण आपल्या देशातील स्वतंत्र चळवळीत सुध्दा युवकांचाच जास्त वाटा होता. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांनी तर वयाच्या फारच कमी वयात देशासाठी त्यांचे प्राण पणाला लावले. जन्माला येणाऱ्या प्रत्येक युवकात या देशासाठी समाजासाठी काही तरी चांगले करण्याची शक्ती आणि तीव्र इच्छा असते आणि या इच्छेच्या बळावरच आपण व आपल्या देशातील तरूण कुठलेली कार्य सिध्द करू शकतात.

तरूणांच्या हृदयात आशा, त्यांच्या मनात आणि त्यांच्या उराशी नवनवीन स्वप्न, त्यांच्या दंडामध्ये कुठल्याही परिस्थितीला सामोरे जाण्याचे बळ, पायात उंच उंच झेप घेण्याची ताकद असते. युवकांमध्ये खुप काही करण्याची इच्छा असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर तरूणांमध्ये आदर्श, उर्जा, उत्साह आणि गती या सर्व गोष्टींनी ते परिपुर्ण असतात. तरूण हा नवीन विचारांना आणि नवीन परिवर्तनाचा स्विकार करण्यासाठी केव्हाही तयार असतो. तरूण हे नवीन काहीतरी शोधु शकतात आणि ते स्विकार सुध्दा करू शकतात. युवक हे द्वेश, हिंसा, मत्सर या भावनांपासून मुक्त असतात आणि धर्म, राष्ट्रीयता, भाषा लिंग, जात आणि वर्ग या सर्व भेदांपासून दुर राहतात आणि त्यांच्या सोबत जुडतात.

देशाच्या एकूणच जडणघडणीत आणि विकासात तरूणांचे योगदान महत्वपुर्ण असते. देशाच्या सामाजिक, सार्वजनिक आणि राजकीय जीवनाबद्दल, घटनेबद्दल तरूणांचे काय मत आहे, हे जाणून घेण्याची प्रत्येकाची इच्छा असते. समकालीन व्यामिश्र पेचप्रसंगात देशात बदल किंवा क्रांती घडवून आणण्याचे काम तरूणच करू शकतो यावर नागरी समाजाचा विश्वास असतो. अनेक देशांतील क्रांतीमध्ील सहभाग, स्वातंत्र्य आंदोलनातील आणि स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक सामाजिक चळवळीतील सक्रीय सहभागातून तरूणांनी आपली कार्यक्षमता दाखवून दिली आहे. अलीकडचे उदाहण म्हणजे अण्णा हजारेंच्या भ्रष्टचाराविरोधी आंदोलनात तरूणांचा सक्रीय सहभाग दिसून आला. फेसबुकवरून अण्णांचे आंदोलन तरूणांनीच चालवले.

तरूण वर्ग आज भूमिका घेण्याच्या मन:स्थितीत दिसतो आहे. देशातील भ्रष्ट प्रवश्त्तीविरूध्द आवाज उठविणाऱ्या अराजकीय नेतश्त्वाकडे जसा तो आकर्षित होतो तसाच तो नव्याने राजकारणात येणाऱ्या नेतश्त्वाकडे देखील आकर्षित होतांना दिसतो. स्पर्धा परीक्षेतील अनेक तरूण किरण बेदी, विश्वास नागरे पाटील, महेश भागवत, टी.चंद्रशेखर इ. प्रमाणेच राहुल गांधींनीही आयडॉल मानतात. उत्तर प्रदेशात राहुल बरोबरच आता अखिलेश यादवांकडे तरूण आकर्षित झालेले दिसतात तर महाराष्ट्रात 'लेक वाचवा' अभियानातून सुप्रिया सुळे घराघरात पोहचतांना दिसते. जशी गर्दी राहुलच्या प्रचार सभांना होते तशीच गर्दी महाराष्ट्रात राज ठाकरेंच्या सभांना होतांना दिसते. प्रचारसभा, त्याचे नियोजन, विविध आंदोलनातील तरूणांचा सहभाग जसा वाढू लागला तसा तो मतदानासाठी देखील बाहेर पडू लागला. राजकारण भ्रष्ट झाले आहे आणि त्यात सुधारणा झाल्या पाहिजेत हे तरुणांना मान्य आहे. परंतू भ्रष्ट राजकारणाचे निर्मूलन स्वत: राजकारणात उतरुण करणे तरुणांना मान्य नाही. तो स्वत: सक्रीयपणे राजकारणात उतरतांना दिसत नाही. राजकारणाकडे करिअर, एक व्यवसाय म्हणून पाहतांना ते दिसत नाहीत हे दिसून आले आहेत.

- **तरूणांच्या राजकीय मतांचा अभ्यास**

दिल्लीच्या सीएसडीएस - लोकनीती संशोधन टीमने तरूणांच्या राजकीय मतांचा मागील वर्षी अभ्यास केला. त्यासाठी नमुना निवड पध्दतीने देशभरातील तरूणांच्या मतांचे सर्वेक्षण करण्यात आले. शहरी-ग्रामीण, तरूण-तरूणी आणि सर्व जात-धर्म-वर्गाचे पुरेसे

प्रतिनिधीत्व समाविष्ट करून तरूणांची सर्वव्यापक मते नोंदवण्याचा प्रयत्न अभ्यासगटाने केला. तरूणांचा अभ्यास करतांना अभ्यास गटाने तरूणांची व्याख्या निश्चीत केली. 'तरूण' म्हणजे कोण? विचाराने, मनाने की वयाने तरूण? कोणत्याही वयात सार्वजनिक जीवनात सक्रीय असणाऱ्या व्यक्तीस विचाराने किंवा मनाने तरूण व्यक्ती अशी व्यापक व्याख्या तरूणांची केली आहे. परंतू या अभ्यासात वयाचा विचार केला आहे. सर्वसाधारणतः १३ ते ३५ वयोगाटातील मुला-मुलींना तरूण-तरूणी म्हटले जाते. संविधानात्मकदृष्टया १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या तरूण-तरूणींना मतदानाचा हक्क दिला आहे. त्यामुळे अभ्यासामध्ये १८ ते ३३ वर्षे वयोगट निवडला आहे. या वयोगटातील तरूणांचा वर्गही दोन भागांमध्ये विभागला जातो. एक १८ ते २५ वयातील तर दुसरा २६ ते ३३ वयोगटातील तरूण होय. या दुसऱ्या गटातील तरूणांचं मत हे पहिल्या वयोगटापेक्षा वेगळं असतं. अभ्यासात तरूण नेतृत्वाच्या व्याख्येत मात्र २५ ते ४० वयोगटातील व्यक्तीचा समावेश केला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील तरूणांची संख्या एकूण लोकसंख्येच्या १/५ आहे. २०२० पर्यंत भारताचे सरासरी वय २९ वर्षे होईल. त्यामुळे तरूणांच्या अभ्यासाचे वेगळेच महत्व आहे. तरूणांचा अभ्यास करण्यामागे उद्देश असा होता की, सध्याचा तरूण आणि इतर वर्ग राजकीय घडामोडींबाबत किती जागरूक आहेत, ते राजकीय स्वरूपाची चर्चा किती करतात, राजकीय सहभाग आणि राजकीय आवडी कशा आहेत, निवडणूक प्रक्रियेमध्ये त्यांचा स्वाभाविक कल कोणाकडे असतो, राजकारणाचा करिअर म्हणून तरूण कसा विचार करतो इत्यादी गोष्टी जाणून घेणे अनेक घटकांआधारे तरूणांच्या राजकीय मतांचा अभ्यास करण्यात आला. त्यातील राजकीय जागरुतता, राजकीय आवड, राजकीय सहभाग, पक्ष पसंती, निवडणूक सुधारणा आणि राजकीय करिअर या सहा घटकांबाबत तरूणांचे काय मत आहे याचा आपण इथे विचार करू.

- **राजकीय जागरुती**

राजकारण, राजकीय घटनांबाबत तरूण किती जागरूक आहेत किंवा राजकीय घटनांबाबत किती माहिती ठेवतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केल्यास असे आढळून आले की, ३१ टक्के तरूण राजकीय दृष्टया जागरुत नाहीत. ६९ टक्के तरूण राजकारणासंदर्भात मर्यादीत प्रमाणात माहिती बाळगतात तर केवळ १५ टक्के जुन्या लोकांमध्ये राजकारणाबाबत अधिक जागरुत तर ४९ टक्के तरूण राजकारणासंदर्भात मर्यादित प्रमाणात माहिती बाळगतात तर केवळ १५ टक्के जुन्या लोकांमध्ये राजकारणाबाबत अधिक जनजागरुती दिसते. १८ ते २५ वयागटातील २३ टक्के तरुणांमध्ये अधिक राजकीय जागरुतता दिसते तर २६ ते ३३ वयोगटामध्ये १८ टक्के तरूण राजकीय घडामोडींबाबत सजग आहेत. यातून वयोगटातील जागरुततेची वाढ आणि घट स्पष्ट दिसते. राजकीयदृष्टया ग्रामीण भागातील तरूणापेक्षा शहरी तरूण अधिक सजग दिसतात. तरूण-तरूणांचा विचार केला तर तरूणींच्या तुलनेत तरूण अधिक सजग दिसतात. सामान्यतः शहरी मध्यम आणि उच्च स्तरातील महिला राजकारणात सक्रिय दिसतात. शिक्षण व प्रसारमाध्यमांमुळे महिलांची मते आता व्यकत होऊ लागली आहेत. परंतु त्या राजकीय जगाला आव्हान करतांना दिसत नाहीत.

- **'यिन' जोडत आहे महाराष्ट्राची युवाशक्ती**

यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क या 'सकाळ' माध्यम समुहाने सुरू केलेल्या चळवळीला एक वर्ष पुर्ण होत असून या कालावधीत सहभागी युवकांनी केलेले छोटे छोटे प्रयोग थक्क करणारे आहेत. ही तरूणाई समाजासाठी काही करू इच्छिते, हे सिध्द झाले असून या चळवळीने युवकांना प्रेरणा आणि बळ दिले आहे. पुढच्या वर्षात राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात 'यिन' चे जाळे विणलेले असेल आणि प्रत्येक सदस्याच्या व्यक्तीमत्वात बदल घडवतांनाच राज्याच्या प्रगतीतही हे तरूण योगदान देतील. याविषयी खात्री आहे. भारत हा तरूणांचा देश आहे हे अनेकदा सांगून झाल आहे. या तरुणांच्या उर्जेला योग्य दिशा देण्याचे हे सामर्थ्य देश उभारणीसाठी वापरण्याच्या प्रयत्नांची गरज आहे. यिन हा असाच एक प्रयत्न आहे. महाविद्यालयीन वयात तरुणांच्या मणात अनेक कल्पना असतात. सर्जनाच्या अनेक शक्यता याच वयात पुढे येतात. पारंपारीक शिक्षण आणि सामाजिक चौकटीत अनेकदा या सर्जनशिलतेला स्थान मिळत नाही. त्या संधी समोर आणणं हेही यिनचं वैशिष्टय आहे. मागच्या वर्षात मुलांच्या उर्मींना वाव देणारे कित्येक उपक्रम राज्यभर झाले. अनेकदा ते यिनच्या सदस्यांनीच आयोजित केले व राबवलेही. विश्वास टाकला आणि मोकळीक दिली तर तरूण अचंबीत करणारी कामं करू शकतात. कल्पना प्रत्यक्षात उतरवतात हे यिनच्या वाटचालीनं दाखवून दिल आहे. राजकारण,

समाजकारण आणि अर्थकारण यासह जगण्याच्या सर्व क्षेत्रांत तरूणाईचा दबदबा वाढवत असतांना रोजच्या जगण्याला सामाजिक जाणिवांची झालर लागली पाहिजे, तरच ही 'यिन' सुरू करण्यामागचा उद्देश फलद्रुप होईल.

केवळ 'सकाळ माध्यम समुहाने' या चळवळीला सुरूवात केली आणि सामाजीक क्षेत्रात काम करणारे अनेक मान्यवर या चळवळीचे भाग बनले. युवकांना जगण्याचे धडे देणारे प्रेरणास्त्रोत झाले. या मान्यता इन्स्पिरेटर्सनी मागचं वर्ष समश्ध्द केलं. सामाजिक जाणिवेचा भाग असणारा अभिनेता अमीर खान याने 'सत्यमेव जयते' या टी.व्ही. शोच्या माध्यमातून युवकांमध्ये जागश्ती पसरविण्याचे काम केले. वर्षभरात जेष्ठ समाज सेवक अण्णा हजारे पर्यावरनतज्ञ पोपटराव पवार, प्रसिध्द कवी मनोज बोरगावकर,, सामाजिक कार्यकर्त्या राजश्री पाटील, प्रसिध्द अभिनेते नंदू माधव यासारख्या अनेक नामवंतांनी या चळवळीला बळ देण्यासाठी अवघा महाराष्ट्र पायाखाली घातला. तरूणाईला दिशा देण्यासाठी अनेक हात त्यानिमित्ताने कामाला लागले आहेत.

महाविद्यालयीन तरूणांचा सर्वांगीन विकास व्हावा आणि त्यांना सामाजिक भानही यावं, यासाठी मागच्या वर्षी 'यिन' चे रोपटे लावले. त्याचे वलय आज राज्यात सर्वत्र पसरले आहे. पुढील वर्षात राज्यातील प्रत्येक महाविद्यालयात 'यिन'ची चळवळ पोहचलेली असेल. चळवळीतील प्रत्येक युवकाला त्याचं ध्येय गाठण्याची प्रेरणा मिळेल, हेच यिनचे ध्येय आहे. ते साध्य होण्यासाठी सतत प्रयत्न करत राहू. त्यासाठीच ही हाक आहे, आयुष्य बदलून टाकणाऱ्या या चळवळीत सहभागी होण्याची

*मनगटात स्वप्नांना जिवंत करण्याची,*
*लाथ मारीन तिथं पाणी काढण्याची,*
*जिद्द आणि अविरत संघर्ष करण्याची,*
*तयारी ठेवावी लागते.*
*हीच ओळख आहे तरूणांची*

◆ **कु.गौरी पुंडकर**
तश्तीयवर्ष विज्ञान

# शेतकरी आत्महत्येची कारणे व उपाय

गेल्या काही वर्षात शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येच्या प्रमाणामुळे विदर्भ चर्चेत आला आहे. भारताने १९९१ पासून नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार केला तरी रोजगारात होणारी वाढ मंद असून शेती उत्पादनात होणारी वाढ समाधानकारक नाही. महाराष्ट्रातील विदर्भ हा शेतकरी आत्महत्येचे केंद्र बनले आहे. शेतकरी मोठ्या प्रमाणत कर्जबाजारी झाला त्यातुन त्याला नैराश्य येते. परंतु केवळ निराशा हेच एकमेव कारण आत्महत्या करण्याचे सांगता येत नाही. त्यात अनेक कारणे आहेत. भारतातील महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, केरळ, कर्नाटक या चार राज्यांमध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पश्चिम विदर्भातील अर्थात अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या जिल्हयात आत्महत्या करणाऱ्यांची संख्या जास्त आहे. महाराष्ट्रातील एकूण आत्महत्येपैकी ७० प्रतिशत आत्महत्या पश्चिम विदर्भातील आहेत. यावरून विदर्भातील शेतकरी आत्महत्येचे स्वरूप लक्षात येते.

शेतकरी आत्महत्या रोकण्यासाठी डिसेंबर २००५ मध्ये मा. मुख्यमंत्री पॅकेज जाहीर केले होते. त्याचाही काही परिणाम झाला नाही. त्यानंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र काही थांबले नाही ते सातत्याने चालूच आहे.

- **शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे :**

आदान प्रदानच्या किंमतीत प्रचंड वाढ त्यामुळे शेतीचा उत्पादन खर्च अधिक येतो व त्यामुळे उत्पादनात वाढ होत नाही. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नावर परिणाम होऊन उत्पन्न घटत जाते. उत्पादनव्यय जास्त व उत्पन्न कमी त्यामुळे कमी शेतकऱ्याचा उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ बसत नाही. याशिवाय अनेक सामाजीक चालीरीती परंपरा ज्या त्याच्या मर्यादीत उत्पन्नात भागविणे त्याला जड जाते. सततची नापीकी, अनुदानाची कमतरता, व्यसनाधिनता ती साखळी तयार होत जाते. शेतकऱ्याला वर्तमानकाळात काही रस राहत नाही. भविष्य काळात काही आशा नाही त्यामुळे निराशेच्या गर्तेत तो ढकलत जातो. आज एकत्र कुटुंबातील एकोपा, एकजुट कमी होते.

**१) उत्पादन खर्च अधिक, उत्पन्न कमी :**

विदर्भातील शेती ही निसर्गावर अवलंबुन आहे. याशिवाय कृषिचा उत्पादन खर्च हा दिवसेंदिवस वाढतच आहे. शेतीसाठी लागणारी विविध साधने जसे, संकरीत बि-बियाने, रासायनीक खते, किटक नाशके यांच्या किंमती प्रचंड वेगाने वाढत आहेत. याशिवाय बरेचदा शेतीत पेरलेले बियाने उगवत नाही तेव्हा दुबार, तिबार पेरणीची गरज निर्माण होते तेव्हा पुन्हा बियान्याचा खर्च वाढतो. या सर्व घटकांमुळे शेतीचा दर एकरी उत्पादन व्यय मोठ्या प्रमाणात वाढत जातो. त्याप्रमाणात शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होत नाही. कृषीमुल्य आयोगाने कृषी उपादनासाठी ठरवुन दिलेला हमीभाव सुध्दा शेतकऱ्यांना मिळत नाही. कृषी उत्पादनात व्यय जास्त व कृषी उत्पन्न कमी त्यामुळे त्याचा ताळमेळ बसत नाही. त्याचा परिणाम शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो.

**२) कर्जबाजारीपणा :**

कर्जबाजारीपणा हे शेतकरी आत्महत्येचे कारण समजले जाते. शेतकऱ्यांच्या पिकांचा उत्पादन खर्च भरून निघेल एवढाही भाव मिळत नाही. त्यामुळे त्याला दरवर्षी कर्ज घ्यावे लागते. नैसर्गीक अवकृपेमुळेही अपेक्षीत पीक येत नाही. नवीन पिकासाठी पुन्हा कर्जाची गरज भासते. याशिवाय शेतकऱ्याला दैनंदिन गरजा भगविण्यासाठी खर्च करावा लागतो. सोबतच मुलांचे शिक्षण, औषधी, अन्नधान्यासाठी कर्जावर अवलंबुन रहावे लागते. या सर्व बोझ्याखाली शेतकरी दबत जातो. शेतकऱ्याला आपला शेतमाल स्थानिक पातळीवर व्यापारी, अडते यांना कमी किंमतीमध्ये विकावा लागतो. अधिक कर्जासाठी सावकाराचा आधार होतो. सावकारी कर्जाचा डोंगर प्रचंड वाढतो. सावकारी कर्जाचा आजचा दर अधिक असल्याने पुन्हा कर्जात वाढच होते. या सर्व परिस्थितीने शेतकरी निराशेच्या गर्तेत जाऊन आत्महत्या करतो.

**३) अपुरी सिंचन सुविधा :**

विदर्भातील शेतकऱ्यांना शेतीमध्ये उत्पादन घेण्यासाठी पावसाच्या पाण्यावर अवलंबुन रहावे लागते. पिकांना आवश्यक त्यावेळेत पाणी न मिळाल्याने उत्पादनात घट होते. विदर्भामध्ये सिंचनाच्या सोयी कमी आहेत. अभ्यासकांनी विदर्भात सिंचनात सर्वात

जास्त अनुशेष निर्माण झाल्याचे मत मांडले. सिंचनाच्या सोयीसाठी शेतकरी विहीर, बोरवेल घेण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्यासाठी सरकारी मदत वेळेवर व पुरेशी मिळत नाही. त्यासाठी सावकाराच्या कर्जाचा आधार घ्यावा लागतो. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यापैकी ९० प्रतिशत पेक्षा जास्त शेतकरी कोरडवाहू शेती करणारे आहे. सिंचनाची अपुरी सुवीधा, कोरडवाहु शेतीचे प्रमाण अधीक हे शेतकरी आत्महत्या करण्याच्या कारणापैकी एक आहे.

**४) शेतीपुरक व्यवसायाची कमतरता :**

दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेळीपालन, वराह पालन सारखे उद्योग शेतीत पुरक व्यवसाय म्हणून करता येतात. शेतकऱ्याकडे भांडवलाचा अभाव असतो त्यामुळे तो शेतीपुरक व्यवसायाची निर्मीती करू शकत नाही. शेतीपुरक व्यवसाय नसल्याने त्यांच्या उत्पन्नात वाढ करता येत नाही. याशिवाय काही प्रमाणात शेतीपुरक व्यवसाय सुरू केल्यावर त्यास अपयश आले तर तो खचून जातो. शेतीपुरक व्यवसायाची कमतरता हे शेतकरी आत्महत्येस कारणीभुत ठरते.

**५) शेतजमिनीचा लहान आकार :**

जमिनीचे आकारमान लहान-लहान होत आहे. त्यामुळे जमिनीच्या लहानशा तुकडयावर शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. शेतीचा अकार छोटा असेल तर त्या शेतीवर चांगल्या प्रकारची बि-बियाने व इतर खर्च करणे शेतकऱ्याला परवडत नाही. या सर्व घटकांचा उत्पादन व्यय अधिक येतो. त्याप्रमाणात उत्पादनात वाढ होत नाही. जमिनीचे तुकडीकरण ही फार मोठी समस्या शेतकऱ्यांसमोर आहे. छोटया आकारमानाच्या शेतीवर सिंचन सुविधा करणे शक्य होत नाही. परिणामी उत्पन्न वाढविण्यासाठी मर्यादा पडतात. लहान आकाराचा शेतीत जीवन जगल्याएवढे उत्पन्न शेतकरी कुटुंबाला प्राप्त होत नाही.

**६) संयुक्त कुटूंबपध्दतीचा ऱ्हास :**

संयुक्त कुटुंब पध्दतीत जोखीम व जबाबदारीने विभाजन होते. परस्परातील ताण-तणाव, भांडणे कुटूंबातील सदस्य आपसात मिटवुन टाकण्यात येतात. विभक्त कुटुंब पध्दती सगळीकडे दिसून येते. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही संयुक्त कुटुंब पध्दती मोडीत निघाली त्यामुळे कठीण प्रसंगात कुटुंबाकडून जो भावनिक आधार मिळायचा तो जवळपास संपला कुटुंब प्रमुखाला सर्व ताण सहन करावा लागतो. याशिवाय ग्रामीण भागातही विविध कुटुंबाचे परस्परातील संबंध एकोप्याचे, घरोब्याचे राहीले नाही. त्यामुळे ताण वाढत जातो व त्याचे रूपांतर कुटूंबप्रमुखाच्या आत्महत्येमध्ये होते.

**७) निकश्ष्ठ प्रतीची साधने :**

कश्षीसाठी बि-बियाने, किटक नाशके, रासायनीक खते, यासारखे आदराने वेळेवर मिळणे आवश्यक असते. खाजगी कंपन्या नफा अधिक प्रमाणात मिळविण्याच्या हेतुंनी बनावट व कमी उगवण क्षमता असणारी बि-बियाने बाजारात विक्रीस उपलबध करून देतात. या बियांन्यांची उगवणक्षमता कमी असते. परिणामी शेतकऱ्याला दुबार पेरणी करावी लागते. रासायनीक खताची कश्त्रीम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना अधिक किंमतीत खताची विक्री करतात. या सर्व घटकांमुळे शेतकऱ्याच्या एकूण उत्पादन व्यय वाढत जातो व कश्षी उत्पादनात घट होते.

**८) सततची नापिकी :**

विदर्भामध्ये सिंचनसुविधा पुरेशा प्रमाणात नाही. विदर्भाची शेती पावसाच्या पाण्यावर आधारीत आहे. त्यामुळे शेतकऱ्याला सतत नापीकीला सामोरे जावे लागते. विदर्भातील सिंचन विहीरी आणि कुपनलीका यावर मोठया प्रमाणात अवलंबुन आहे. पावसाच्या पाण्याची कमतरता असल्याने विहीरीची पातळी दिवसेंदिवस खोल जात आहे. त्यामुळे पिकांना पाणी देता येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना अल्पउत्पादकतेची झळ बसते.

**शेतकऱ्याच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना :**

**१) सिंचन सुविधेत वाढ :**

विदर्भात सिंचनाचा अपुऱ्या सोयी सवलतीमुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबुन आहे. त्या शेतीतून एकच पीक घेतले जाते. विदर्भाचा सिंचन अनुशेष भरून काढण्यासाठी उपाय योजना केली जाते. पावसाच्या पाण्याचा योग्य वापर समाजात जल व्यवस्थापन व जलसाक्षरता वाढविणे गरजेचे आहे.

**२) कर्जमाफी :**

शेतकरी आत्महत्यावरील तात्कालीन उपाय म्हणजे कर्जमाफी होय. अल्पभुधारक शेतकरी आतमहत्या करण्याचे कारण कर्जबाजारीपणा हे आहे. अल्पभुधारक शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी. कर्ज काढणे हा गंभीर प्रश्न नाही तर कर्जाची परतफेड करण्याची क्षमता नसणे हा गंभीर प्रश्न आहे. त्यादृष्टीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. अल्पभुधारक कोरडवाहु शेतकऱ्यांकडे कर्ज परतफेडीची क्षमता नसते. त्यामुळे त्यांना कर्जमाफी देऊन आत्महत्या रोखता येतील.

**३) बी-बीयांनांची उपलब्धता :**

शेतकरी खाजगी दुकानदाराकडून बी-बीयाण्यांची खरेदी करतो. बरेचदा बियाणे प्रमाणित नसल्याने कमी दर्जाची बियाणे शेतकरी शेतात पेरतात. त्याची उगवण क्षमता कमी असली तरी ते उगवत नाही. शेतकऱ्याला दर्जेदार बी-बीयाण्यांचा पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभी करायला पाहिजे. याशिवाय बी-बीयाण्यांच्या वाढत्या किंमती शेतकऱ्याला परवडत नाही. त्यामुळे बियाण्यावरील अर्थसहाय्यतेत वाढ करावी. बीयाण्या सोबतच रासायणीक खताच्या किंमतीवरही नियंत्रणाची आवश्यकता आहे.

**४) सुलभ कर्जपुरवठा :**

अल्पभुधारक शेतकऱ्यांची सर्वात मोठी समस्या भांडवलाची कमतरता ही आहे. शेतकरी कृषीकर्जाचा उपभोग खर्चासाठी घेतात. त्यासाठी अधिकोषण व्यवस्था अपुरी आहे. त्याशिवाय बॅंक अधिकारी, शेतकरी व शेताला कर्ज पुरवठा करण्यास फारसे उत्सुक नसतात. त्यावेळी सावकारी कर्ज हा उपाय शेतकऱ्याकडे राहतो. व्यापारी बॅंकेने शेतकऱ्याच्या कर्जाविषयक गरज जाणून घेऊन त्यांना वेळेवर कर्जपुरवठा केला तर शेतकऱ्यांची भांडवलाची समस्या काही प्रमाणात कमी करता येईल.

**५) जोड उद्योगाची निर्मीती :**

शेतकऱ्याला शेती उत्पन्नासोबतच अन्य मार्गाने जोडउद्योगधंद्यातून उत्पादनात वाढ करता येईल. शेतीवर आधारीत जोड उद्योग यामध्ये पशुपालन, कुक्कुटपालन, शेळीमेंढी पालन, मत्स्य व्यवसाय शेतकऱ्यांनी सुरू करावेत. याशिवाय पीठ गीरणी व्यवसाय, वाहतुक व्यवसाय, मधुमक्षीका पालन इ. व्यवसाय हे जोडव्यवसाय आहेत. यासारख्या पुरक व्यवसायाच्या आधारे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करता येईल.

**६) सेंद्रीय शेतीपध्दतीकडे लक्ष :**

शेतकऱ्यांनी रासायनीक खताऐवजी जर सेंद्रीय खताचा वापर केला तर त्याचा अनुकुल परिणाम जमिनीचा पोत सुधारण्यात होतो. रासायनीक खताच्या किंमती अधिक असतात. परिणामी उत्पादन खर्च वाढत जातो. सेंद्रीय खताच्या किंमती कमी असल्याने उत्पादन खर्च कमी येतो.

**७) माती परीक्षण :**

शेती हा जरी जुना व्यवसाय असला तरी वर्तमानकाळात शेती करणाऱ्या प्रत्येकाला शेती उत्पादनाची संपूर्ण माहिती असतेच असे नाही. जमीन आणि श्रम हे शेतीतील प्रमुख घटक आहेत. शेतीत चांगले पीक घ्यायचे असेल तर पिकांच्या चांगल्या वाढीसाठी जी पोषक द्रव्ये आवश्यक आहे ती आपल्या जमीनीत आहेत का? हे शेतकऱ्यांनी तपासून पाहिले पाहिजे. शेतजमीनीचे माती परिक्षण करणे आवश्यक आहे. माती परीक्षणातून शेतीसाठी आवश्यक पोषक द्रव्याची माहिती शेतकऱ्याला मिळेल व शेती उत्पादनात वाढ करता येईल.

♦ कु.चैताली अलकरी
द्वितीय वर्ष कला

# शिवाजी महाराजांचे तरूणाप्रती विचार

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना मानाचा मुजरा. त्यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३०. राज्यभिषेक जून ६, १६७४ त्यांचे पुर्ण नांव शिवाजीराजे शहाजीराजे भोसले.

शिवाजी महाराजांचे तरूणांप्रती विचार त्यांच्या प्रमाणे तरूण कसा असला पाहीजे. शुर, विर, धाडशी, पराक्रमी अशा विचारांचा तरूण आपल्या देशाला हवा परंतू आजचा तरूण हा दिशाहीन झाला आहे, शरीराने तरूण आहे पण मनाने म्हातारा झाला आहे. त्याला दिशाच नाही हे खुप मोठे दुःख आहे, तरूणाने आत्मविश्वासी बनावे. ज्या तरूणांची शिवाजी महाराजांना अपेक्षा होती, तसे तरूण आज घडले पाहीजे. ज्या शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन करण्यासाठी रक्ताचे पाणी केले आणि पराक्रम गाजवुन दाखविला तसे आजच्या तरूणाने पराक्रम गाजवुन दाखविला पाहीजे.

शिवाजी महाराजांनी तरूणांना उद्देशुन म्हटले होते की, तरूनांनो सैन्यात भरती व्हावे. शिवाजी महाराजांनी हिंदवी सेनेचे नेतृत्व केले त्यावेळी त्यांच्या सेनेमध्ये चतुर, चानाक्य, परक्रमी अशा तरूणांची नियुक्ती केली. आज आपण म्हणतो शिवबा जन्माला आला पाहीजे पण आपणच शिवाजी महाराजांसारखे पराक्रमी, शुर व धाडशी बनण्याचा प्रयत्न केला तर सर्व घराघरात शिवाजी महाराज जन्माला येतील.

शिवाजी महाराजांवर त्यांच्या आईवडीलांनी त्यांच्यावर खुप खंगले संस्कार केले होते. असे संस्कार आपल्यावर नेहमीच पडत असतात. परंतु ते आपण आत्मसात करायला हवे. आजच्या तरूणांनी आपल्या देशाप्रती खुप प्रेम करावे, देशाची सेवा करावी. आजच्या तरूणांनी शिवाजी महाराजांचे स्वप्न पुर्ण करायला पाहीजे. त्यांचे स्वप्न तरूण हा पराक्रमी बनला पाहीजे, धाडशी व आत्मविश्वासू बनला पाहीजे व स्वतः पराक्रम गाजवुन विजयी ठरला पाहीजे. जशी अपेक्षा शिवाजी महाराजांना तरूणांप्रती होती तसे तरूण बनण्याचा प्रयत्न नक्कीच तरुणांनी केला पाहीजे.

तरूणांसमोर खुप संकट असतील तर तरूणांनी त्या संकटांना घाबरायचे नाही किंवा प्रयत्न करणे सोडून द्यावयाचे नाही सतत पराक्रम गाजवुन दाखवावा. विजय आपलाच होईल किंवा अपयश आल्यानंतर प्रयत्न करणे सोडून देवु नका म्हणतात ना अपयश ही यशाची पहिली पायरी असते.

शिवाजी महाराजांनी तरूणाला सांगीतले की, तरूणाने आपला विवेक जागश्त ठेवावा आपल्याला माहितच आहे की शिवाजी महाराजांनी त्यांच्या प्रत्येक लढाईत युध्द कमी केले व कुटनितीचा जास्त वापर केला. म्हणून कोणतेही कार्य विवेकाने व विवेक बुध दीने करावे. असे चिरंतर हश्दयात राहणारे विचार हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी सांगीतले.

♦ कु.मोनिका माहोरे
तृतीय वर्ष कला

# विद्यार्थी आणि शिस्त

विद्यार्थ्यांमधील असंतोषाचे दर्शन घडवणाऱ्या बातम्या वश्तपत्रात वारंवार येत असतात. विद्यार्थ्यांचा विद्यापीठावर मोर्चा, विद्यार्थ्यांचा कुलगुरूंना घेराव, विद्यापीठाच्या निर्णयावर चिडून विद्यार्थ्यांकडून जाळपोळ अशा एक ना दोन! आणि त्या वाचून मग जुन्या पीढीतले लोक कुरकुरतात, काय ही विद्यार्थ्यांतील बेशिस्त!, हे कसले विद्यार्थी, हे तर निव्वळ गुंड आहेत, गुंड! खरे म्हणजे जुण्या पीढीतील लोकांना आजच्या विद्यार्थ्यांचे सगळे वागणे गैर वाटते. त्यांना त्यांचे आधुनिक कपडे आवडत नाहीत, त्यांची आधुनिक पद्दतीची केशरचना आवडत नाही, त्यांचे चित्रपटांचे वेड आवडत नाही, पुरूषी पोशाख करण्याची मुलींची फॅशन त्यांना रूचत नाही, मुलामुलींचे परस्परांशी मोकळे वागणे त्यांना बिलकुल पसंत नाही. यामुळे मग शेवटी हे या निष्कर्षाप्रत येतात, या काटयांनी अगदी ताळतंत्र सोडले आहे. कोण आवरणार यांना? यांचे पुढे कसे काय निभावणार आहे, काही कळत नाही. यातुन एक गोष्ट लक्षात येते की, हा सारा दोन विढयांमधील वैचारीक अंतराचाच परिणाम आहे. या त्राग्याची सुरूवात नेहमी अशी असते "आमच्या वेळी अस नव्हत बाई! आम्ही काही शिकलो नाही का? पण ही थेरं नव्हती हो". "अहो आम्ही तर दिवसभर नोकरी करून रात्र शाळेतून शिकलो" कुणी तात्यासाहेब माहिती देतात, या मुलांना सर्व काही हवं ते आयतं कष्ट नकोत. केवळ पुस्तके आणून पुरत नाहीत, त्याशिवाय त्यांना मार्गदर्शके लागतात. केवळ कॉलेजमधील अध्ययनावर यांचचं भागत नाही, यांना कोचींग क्लासला देखील जायचं असतं. बरं, घच्या कामाल तरी यांचा काही हातभार आहे? काही काम सांगीतलं तर यांचा अभ्यास आड येतो, पण रस्त्याच्या कोपऱ्यावर किंवा हॉटेलच्या दाराशी तासन्‌तास गप्पा मारतांना यांचा अभ्यास आड येत नाही वाटत!. एकूण या सर्व चर्चेचा शेवट काय? तर आजचा विद्यार्थी हा फार बेशिस्त आहे, पार बिघडून गेला आहे.

हा विद्यार्थी जेव्हा आंदोलन उभारतो, तेव्हा तर त्याचा बेशिस्तपणाचा कळसच होतो, पण कोणी असा विचार कधीच करत नाही की, विद्यार्थी शिस्त का मोडतात? त्या काही अशी विद्यार्थ्यांशी संबंधीत अशी ही मोठी माणसेच जबाबदार नाहीत का? काही दिवसांपुर्वी एक विद्यार्थ्यांचा मोर्चा निघला होता, कशासाठी, काय मागणी होती त्यांची? तर आमच्या परीक्षा वेळेवर घ्या आता सांगा हे अशी मागणी करणारे विद्यार्थी बेशिस्त कसे? तसे परीक्षांचे निकाल वेळेवर लागत नाही त्याकरिता मोर्चे काढले तर विद्यार्थी बेशिस्त कसे? अनेक महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून भरभक्कम फी घेतात, पण त्याच्या मोबदल्यात विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे शिक्षण दिले जाते का? कित्येकदा प्रश्नपत्रिकेतील प्रश्न हे अभ्यासक्रमाच्या बाहेरील असतात. म्हणून मग विद्यार्थी या प्रश्नपत्रिकेंची होळी करतात. कित्येक वेळा परीक्षा होऊन चार-चार महिने लोटले तरी परीक्षांचे निकाल लागत नाही, मग विद्यार्थी असवस्थ होतात. अशा वेळी त्यांच्यावर अन्याय करण्यासारखे नाही का?

आजचा विद्यार्थी हा अधिक प्रगल्भ आहे, कर्तबगार, महत्वाकांक्षी आहे, पुर्वीसारखे 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी त्यांची वश्ती राहिलेली नाही. त्याला आपल्या हक्कोची जाणीव झाली आहे. आपले हक्क अबाधीत राखण्यासाठी तो जागरूक असतो. मग तो आपल्या मागण्यांसाठी मोर्चे, घेराव, संप हे मार्ग अनुसरतो. त्यात त्याची काय चुक आहे? खरे पाहता आजचा विद्यार्थी बेशिस्त नाही. बेशिस्त आहे तो आजचा समाज! आज त्यांच्यापुढे आदर्श आहेत बेशिस्तीचे. वडीलधाऱ्या माणसांणी त्यांच्यापुढे एकाहुन एक त्यागी ध्येयनिष्ठांचे आदर्श होते असे निश्चीत उदात्त कार्य जर या आजच्या विद्यार्थ्यांपुढे ठेवले गेले तर ही आजची युवापीढी अफाट कतर्ईत्व गाजवु शकेल. अनेक संकट प्रसंगी त्यांनी याची चुणूक दाखवली आहे. देशावर नैसर्गीक संकट ओढवो वा परकीय आक्रमन येवो अर्थातच हे विद्यार्थी आघाडीवर असतात. श्रमदान, रक्तदान करतात. जिवाची बाजी लावुन अडचणींचे डोंगर पार करतात. केव्हा तर त्यांच्या शिस्तबद्द वर्तनाला तोड नसते. अशा या कर्तबगार विद्यार्थ्यांना अस्वस्थ करणाऱ्या दुसऱ्या गोष्टी म्हणजे बेकारी व वशिलेबाजी होय. आपल्या गुणांचे कष्टांचे चीज होत नाही असे पाहिल्यावर हे विद्यार्थी प्रक्षुब्ध होतात. हयाला जबाबदार अर्थातच आपला सारा समाजच आहे. म्हणजेच बेशिस्त कोण असेल, तर तो आजचा समाज आहे. आजचे विद्यार्थी नव्हेत. म्हणून आजचा विद्यार्थी बेशिस्त आहे असे कुणीही समजू नये.

♦ कु.नेहा कदम
तृतीय वर्ष कला

# भ्रष्टाचार

भ्रष्ट + आचार यापासून भ्रष्टाचारी हे विशेषण बनते. या विशेषनांचा स्थुलमानाने अर्थ सत्पथभ्रष्ट किंवा नितीभ्रष्ट असा करता येईल. त्यामुळे केवळ आर्थिक गैरव्यवहारच नव्हे तर नैतिक अपेक्षेचे पालन झाले नाही अथवा इतर गैरव्यवहार - नियमांचे उल्लंघन झाले. तरी भ्रष्टाचार झाले असे म्हणतात. महात्मा गांधींच्या काळातील गांधीवादी आणि समाजवादी हे नैतिक दश्ष्टया शुध द आणि पारदर्शी व्यवहारास साधन सुचिता असे म्हणत.

व्याख्या :- न्या.पी.बी.सावंत चौकशी आयोगाने सादर केलेल्या अहवालात भ्रष्टाचाराच्या व्याख्येत लाचखोरीबरोबर जबाबदारीच्या पदावर असलेल्या व्यक्तीची बेपर्वाई अपव्यय पक्षपातीपणा यांचाही समावेश केला आहे. भ्रष्टाचाराचा इतिहास कर्मचाऱ्यांकडून होण्याची शक्यता असलेल्या भ्रष्टाचाराचा उल्लेख कौटील्याच्या अर्थशास्त्रात केला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात भ्रष्टाचारी प्रकरणे उजेडात आणून प्रशासनावर आणि एकूण राजकारणावर संसदेचा अंकुश अणण्यात फिरोज गांधी हे नेते पत्रकार अग्रणी होते.

भ्रष्टाचाराचे समर्थन :- भ्रष्टाचाराचे सहसा उघड-उघड समर्थन टाळले जाते. असे असले तरी सरकारी कारकुन अपुरा पगार अथवा महागाईचे कारण पुढे करुण भ्रष्टाचार करतांना लोक आपल्याला दिसतात. काम न करण्यापेक्षा अथवा न होण्यापेक्षा कुणी पैसे घेवुन काम करत असेल तर चुकीचे नाही ते आपल्याच अमुक तमुक समाजातील माणसाचा आर्थिक विकास झाला तर त्यात काही वावगे नाही. उलट लाच घेणाऱ्या माणसावर टिका करून त्याचे पाय ओढणे चुकीचे आहे हेही सांगीतले जाते तर काहीवेळा त्या पैशातुन चांगली कामे कशी केली जातात त्याचे दाखले दिले जातात. पण अशी समर्थने एका मर्यादेच्या पुढे जाऊ शकत नाहीत. माध्यमातील विचारवंत सोईच्या विकासासाठी भ्रष्टाचार ही अल्पशी किंमत आहे अशी भुलावन करतात. भ्रष्टाचाराचे समर्थन करतांना बऱ्याचदा जपान सारख्या विकसीत देशाचे उदाहरण सुध्दा दिले जाते. भ्रष्टाचार काळा पैसा, पैशांचा गैरव्यवहार, दहशतवाद आणि दहशतवाद्यांना पुरविले जाणारे अर्थसहाय्य त्याचबरोबर बनावट नोटा. अशा चलनासंबंधी विविध समस्यांच्या विरोधात ठोस कारवाई महणून भारत सरकारने दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या मध्यरात्रीपासून ५०० आणि हजाराचया नोटा चलनातून रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय रिझर्व बॅंकेने दोन हजार रूप्याची नवीन नोट आणि पाचशे रूप्याची नोट चलनात आणून शिफारशी केल्या होत्या. त्या सरकारने मान्य केल्या आहेत. शंभर, पन्नास, दहा, पाच आणि एक रूपयाच्या नोटा चलनात पुर्वीप्रमाणेच कायम राहणार आहेत. आजच्या निर्णयाचा त्यांच्या वापरावर कोणताही परिणाम होणार नाही. या संदर्भातील महत्वपुर्ण घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवार दिनांक ८ नोव्हेंबर २०१६ रोजी सायंकाळी दुरचित्रवाणी माध्यमाद्वारे केली. या निर्णयामुळे भारताच्या प्रामणीक आणि कष्टकरी जनतेचे हित पुर्णपणे सुरक्षीत राहणार आहे. ज्या राष्ट्रविरोधी आज विरोधी घटकांकडे आता पाचशे आणि एक हजार रूप्यांच्या नोटा साठवुन ठेवल्या असतील त्यांची किंमत आता कागदाच्या तुकडयाएवढी असेत. भ्रष्टाचार, काळा पैसा आणि बनावट नोटा यांच्या विरोधात पावले उचलण्यासाठी सुरू केलेल्या लढाईमुळे सामान्य नागरीकांचे हात अधिक बळकट होणार आहेत. असेही पंतप्रधन यांनी यावेळी सांगीतले होते. आगामी काही दिवसात सामान्य नागरीकांना काही समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. अशा संभाव्य समस्यांवर मात करण्यासाठी सरकारने वेगवेगळया उपाय योजना केल्या. ज्या व्यक्तींकडे पाचशे किंवा एक हजार रूपयांच्या नोटा आहेत त्या व्यक्ती या सर्व नोटा दि. १० नोव्हेंबर ते ३० डिसेंबर २०१६ पर्यंत बॅंक अथवा टपाल कार्यालयात जमा करू शकणार आहेत अशी घोषण पंतप्रधानांनी यावेळी केली. काही दिवसांसाठी एटीएम आणि बॅंकमधून किती पैसे काढायचे यावर काही मर्यादा निश्चीत करण्यात आल्या आहेत. सरकारी रूग्णालये, सरकारी रूग्णालयातील औषधांची दुकाने (डॉक्टरांच्या चिठ्ठीबरोबर) रेल्वे आरक्षण केंद्र पेट्रोल, डिझेल आणि सार्वजनीक तेल कंपन्यांची गॅस स्टेशन्स राज्य आणि केंद्र सरकारची अधिकृत दुध विक्री केंद्र इत्यादी.

दफनभुमी आणि स्मशानभुमी या ठिकाणी मानवतेच्या दश्ष्टीकोणातून पाचशे आणि एक हजाराच्या नोटा तूर्त स्वीकारल्या जणार आहेत असे यावेळी पंतप्रधान मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. काळा पैसा टिकुन राहण्यासाठी काळाच्या कसोटीवर टिकूण राहिलेली प्रतिबध्दता काळ्या पैशांचे संकट दुर झाले. याची खातर जमा करण्यासाठी सरकार कटीबध्द आहे. काळया पैशाबद्दल विशेष तपास पथक स्थापन करण्याच्या पंतप्रधानांच्या नेतश्त्वाखालील रालोआ सरकारचा पहिला निर्णय होता. मेक इन इंडीया, स्टार्ट अप्पर इंडीया, स्टॅन्ड अपर इंडिया यासारख्या उपक्रमांकामुळे भारतीय उद्योगाला आणि कल्पकतेचा जोम मिळाला आहे.

♦ कु.नवदुर्गा खंडेराव
तृतीय वर्ष कला

# डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जीवन व कार्य

डॉ. पंजाबराव देशमुख हे केवळ विदर्भातीलच नव्हे तर भारतातील महान व्यक्तीमत्व होते. त्यांची जन्मभुमी आणि कर्मभुमी ही विदर्भ आहे. त्यामुळे त्यांचे नांव विदर्भात सर्वतोमुखी झाले आहे. डॉ.पंजाबरावांनी विदर्भातील जनतेच्या अंत:करणावर स्वत:च्या कर्तश्त्वाचा ठसा उमटवलेला आहे. विदर्भाचे पंचप्राण म्हणून ते ओळखले जातात कारण आजचा विदर्भ त्यांनी घडवलेला आहे. विदर्भातील जनतेची मते त्यांनी आकाराला आणलेली आहेत. येथील सर्वसामान्य जनतेच्या जीवनाला त्यांनी वळण लावले आहे. त्यांच्या नुसत्या स्मरणाने देखील जनता पुलकीत होऊन त्यांच्या मुर्तीसमोर नतमस्तक होते. येथील जनतेचे ते हृदय सम्राट आहेत.

डॉ. पंजाबरावांच्या कर्तश्त्वाचे क्षेत्र फक्त विदर्भापुरते मर्यादीत नाही. संपूर्ण भारत हे त्यांच्या कर्तश्त्वाचे क्षेत्र आहे. भारतातील शेती, राबणारे शेतकरी, शेतकऱ्यांचे कुटूंब यांचे जीवन सुखसमश्ध्द करण्यासाठी, त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी, त्यांच्याद्वारे भारताचे जीवन उंचवण्यासाठी डॉ.पंजाबरावांनी अखील भारतीय पातळीवर शेतकऱ्यांची संघटना उभी केली. त्यांनी अखील भारतीय कश्षक समाजाची स्थापना केली. या कार्यासाठी त्यांनी अखंड भारतभ्रमण केले आहे. आता तर त्यांनी आंतराष्ट्रीय स्वरूपाच्या शेतकरी संघटना निर्माण केल्या आहेत. जागतीक क्षेत्रात पंजाबरावांनी टाकलेली पावले नवीन असली तरी तेथे ती दश्ढमुल होतील, ते आपल्या कर्तुत्वाने न पुसले जाणारे ठसे उमटवतील पंजाबरावांच्या महत्वाकांक्षेचे क्षेत्र अतिशय व्यापक आहे. त्यांची दश्ष्टी विशाल आहे, कर्तुत्व क्रियाशील आहे. पंजाबरावांनी केलेल्या सर्व उद्योगांची निर्मीती ही शेतकऱ्यांविषयी असलेल्या त्यांच्या अंत:करणातील जिव्हाळ्यातून झालेली आहे. या जिव्हाळयाला जातींची, प्रातांची, देशांचीही बंधने नाहीत. सर्व शेतकरी त्यांना जीव की प्राण मानतात याचे कारण त्यांच्या अंत:करणातील हा जिव्हाळा होय.

डॉ.पंजाबराव हे स्वत: हाडाचे शेतकरी होते. भारतीय शेतकऱ्यांच्या जीवनातील दु:ख दारिद्रयाचा दाहक अनुभव त्यांनी घेतला आहे. भोवतालच्या शेतकऱ्यांचे दैन्य, अज्ञान, उपासमार, कष्ट, अवहेलना, पिळवणूक त्यांनी पाहिली होती. त्यामुळे त्यांचे हृदय पिळवटून निघाले. त्यातूनच त्यांचे आयुष्य, त्यांचे ध्येय आकाराला आले. या ध्येयसिध्दीसाठीच पंजाबरावांचे अखंड परिश्रम चालू असत. त्यांच्या परिश्रमांना मर्यादा नाही, उसंत नाही, तमा नाही, तो एक अखंड यज्ञ आहे. या यज्ञात त्यांच्या जीवनातील सुखस्वास्थ्याच्या समिधा समर्पित झाल्या आहेत. शेतकऱ्यांचे दु:ख - दारिद्रय नाहीसे होण्यासाठी प्रथम तो शिक्षीत झाला पाहिजे, स्वत:च्या परिस्थितीची आणि सामर्थ्याची त्याला जाणीव झाली पाहिजे, त्याचा आत्मा जागृत झाला पाहिजे हे डॉ.पंजाबरावांनी ओळखले. शेतकऱ्यांच्या मुलांनी शिक्षण घेतले पाहिजे असे डॉ.पंजाबरावांना वाटत होते. शिक्षणाकडे वळण्याची प्रवृत्ती निर्माण केली पाहिजे, सोयी नसतील तर त्या करून दिल्या पाहिजेत हे ओळखून पंजाबरावांनी आपल्या कार्याला आरंभ केला. अमरावती जिल्हा कौन्सीलचे अध्यक्ष असतांना त्यांनी शिक्षण सक्तीचे केले. शिक्षणाच्या सोयी वाढविण्यासाठी शिक्षण कर वाढविला. त्यापूर्वी खेडयापाडयातून दौरे काढुन शेतकऱ्यांना महत्व पटवून दिले. शिवाजी हायस्कुलमध्ये नवीन चैतन्य निर्माण केले. स्वत: त्यांनी तेथे शिक्षण दिले. डॉ. पंजाबरावांनी त्या काळात 'श्रध्दानंद' छात्रालयाची स्थापना केली. हे छात्रालय म्हणजे पंजाबरावांच्या शैक्षणीक व सामाजिक व्यापक दृष्टीकोणाचे मुर्तीमंत प्रतीक होते. बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची अत्यंत कमी खर्चाच्या छात्रालयाची सोय करून त्या विद्यार्थ्यांच्या मनात श्रम प्रतिष्ठा वाढविण्याचे कार्य देखील त्यांनी केले. सामाजिक क्षमतेचे बीजारोपन विद्यार्थ्यांच्या अंत:करणात निर्माण करण्याचा त्यांचा महान प्रयत्न होता. छात्रालयात जातीधर्माची बंधने नव्हती. हे श्रध्दानंद छात्रालय म्हणजे डॉ.पंजाबराव यांच्या 'जिव्हीचा जिव्हाळा'. डॉ.पंजाबरावांनी १९३२ साली श्री शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज संस्थेचे रूपांतर विशाल वटवृक्षात झाले आहे. या वटवृक्षाच्या सावलीत कितीतरी विद्यार्थी विसावत आहेत. या वटवृक्षातून झीरपणारा ज्ञानाचा रस पिऊन काही पाखरे अनंत आकाशात उड्डान करण्यास निघून जातात तर असंख्य खेडयातील विद्यार्थी इथे येत असतात. कला, विज्ञान, वाणिज्य, विधी इत्यादी विषयांचे असंख्य विद्यार्थी ज्ञान घेत आहेत. या नवसृष्टीचे भाग्यविधाते डॉ.पंजाबराव हे होते. आज या संस्थेचा

खुप मोठा विस्तार झाला आहे. डॉ.कोलते यांनी या संस्थेला श्री शिवाजी लोकविद्यापीठ असे म्हटले आहे व या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.पंजाबराव होते असे स्पष्ट केले आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्था आणि डॉ.पंजाबराव यांचे अतुट नाते होते. डॉ.पंजाबरावांचे शैक्षणीक कार्य फार मोठे आणि महत्वाचे होते. जनतेपर्यंत शिक्षण नेऊन पोहचविण्याचे कार्य महाराष्ट्रात कर्मवीर भाऊराव पाटलांनी व विदर्भात डॉ.भाऊसाहेब देशमुख यांनी केले. ज्ञानाची गंगा खालच्या पातळीवर आणण्याचे कार्य डॉ.पंजाबरावांनी केले. त्यांच्या या महान कार्याला अन्यत्र तोड नाही. त्यांनी जनतेपर्यंत ज्ञानगंगा पोहोचवून समाजातील उच्चनिचता नाहीशी करून सर्वांना समान पातळीवर आणले. डॉ.कोलते म्हणतात, "शांतपणे घडून आलेली ही फार मोठी सामाजीक क्रांती होय" डॉ.पंजाबरावांनी अनेक पदे उपभोगली. जिल्हा कौन्सीलचे अध्यक्ष असतांना त्यांनी अमरावती जिल्हयात शिक्षण सक्तीचे केले. शिक्षण कर वाढवून शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सवलतीने प्रवेश देण्याचे तत्व त्यांनी प्रचलीत केले. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षणाच्या सवलती प्राप्त करून दिल्या. कोणतेही शिक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण शुल्कात एक तृतियांश सार्वत्रीक सुट त्यांनी जाहीर केली. डॉ.पंजाबरावांनी कृषीमंत्री या नात्याने विशेष महत्वाचे कार्य केले. ते म्हणजे कर्ज लवादाचा कायदा. डॉ.वि.भी. कोलते म्हणतात "कर्जाच्या समुद्रात गटंगळया खात असलेल्या शेतकऱ्यांना त्याने केवढा आधार दिला आणि कर्जात गहाण ठेवलेली शेती त्यामुळे कशी वाचवता आली? हे अभ्यासले म्हणजे डॉ. पंजाबराव यांच्या क्रांतीकारक प्रतिभेची खरी कल्पना येते." डॉ. पंजाबरावांनी हा कर्ज लवाद कायदा लागू केला त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी सावकारांकडून परत मिळाल्या. हा कर्ज लवाद कायदा म्हणजे शेतकऱ्यांना मिळालेले इश्वरी वरदान होय. डॉ.पंजाबरावांनी सर्व शेतकरी सदासर्वदा सारखेच मानले. जात ध र्म त्यांनी कधी मानले नाही. कधी पक्षपात केला नाही. "नदी ज्याप्रमाणे खालच्या भूभागाकडे धावत जाते त्याप्रमाणे समाजातील खालच्या वर्गाकडे, गोरगरिबांकडे आणि दिनदुबळयांकडे डॉ.पंजाबरावांचे अंत:करण स्वभावत:च धावत जाते आणि खाली खाली जात असतांना नदी ज्याप्रमाणे सर्वांना सारखे पाणी देते, कोणत्याही प्रकारचा भेदभाव करित नाही त्याचप्रमाणे डॉ.पंजाबरावांचे जीवन देखील सर्वांच्याच सेवेसाठी समत्वाने समर्पित असे जीवन आहे असे डॉ.कोलते म्हणतात. डॉ.पंजाबराव लोकसभेत गेले त्यांच्या अविरत परिश्रमाने आणि कर्तृत्वाने पंडीत नेहरू यांचे लक्ष त्यांनी आपणाकडे सहज वेधून घेतले. केंद्रीय मंत्रीमंडळात कृषीमंत्री म्हणून स्थान मिळाले. दिल्लीच्या वातावरणात डॉ.पंजाबरावांना अधिक कर्तृत्व गाजविण्याची संधी मिळाली. त्यांची दृष्टी अधिक व्यापक झाली, विस्तारली, तिची झेप दुरदुरची क्षेत्रे धुंडाळू लागली. पंजाबरावांनी केलेल्या कार्यामुळे अनेक उपेक्षीत समाजांना शिक्षणविषयक सवलती मिळाल्या. उपेक्षीतांचे जीवन त्यामुळे आकाराला आले. लक्षभोजनाची संघटनाही लक्षवेधी, अभिनव व भव्य अशी होती. त्यांचा जपानी भातशेतीचा प्रयोग अतिशय महत्वपुर्ण होता. शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी डॉ.पंजाबरावांनी 'भारत कृषक समाज' स्थापन केला ही एक महत्वाची देशव्यापी संघटना होती. या माध्यमातून त्यांनी 'राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी - विक्री संघ' निर्माण केला. कृषी सहकारी भारतीय अधिकोष आफ्रीका, आशिया ग्रामीण पुर्नसंघटना, कृषी सहाय्यक संघटना, अखील भारतीय मधमाशी पालक संघटना, अखील भारतीय जाडगूळ महासंघ, या संधटनांबरोबरच त्यांनी कृषी उत्पादकांच्या आंतराष्ट्रीय संघटनांचा संघही निर्माण केला. या बहुविधी संघटनांकडे नुसता दृष्टीक्षेप केला तरी मनुष्य आश्चर्य चकीत होतो. सर्व संघटनांची कामे करण्यासाठी ती व्यवस्थीत व पध्दतशीर करण्यासाठी डॉ.पंजाबरावांना अतिव कष्ट उपसावे लागले. हे करत असतांना त्यांनी आपल्या जिवीच्या जिव्हाळयाकडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही हे विशेष. डॉ. कालते म्हणतात, "घार अनंत आकाशात उंच उंच घिरटया घालीत असतांनाही तिचे लक्ष घरटयातील आपल्या पिलाकडे असतेच ना? शेतिविषयक आणि शिक्षणविषयक कार्य करीत असतांना डॉ.पंजाबरावांचे राष्ट्रीय कार्याकडे पूर्ण लक्ष होते, स्वातंत्र्यपूर्व काळात राजकारणाच्या आखाडयात ते धडाडीने उतरले होते. म.गांधी प्रणीत स्वातंत्र्याच्या कार्यक्रमाला ते हातभार लावत होते. स्वातंत्र्य प्राप्ती आणि राष्ट्राभिमान यांना त्यांच्या अंत:करणात सदैव सर्वव्यापी स्थान मिळालेले आहे. दीनदुबळयांची, गोरगरीबांची, रंजल्यागांजल्यांची सेवा करण्यात डॉ.पंजाबरावांनी आपले सर्वस्व समर्पण केले आहे. जीवनाचा क्षणन्क्षण आणि सामर्थ्याचा कणनकण या सेवेसाठी त्यांनी वेचला. डॉ.पंजाबरावांना स्वतंत्र प्रापंचीक

जीवन नव्हतेच मुळी, त्यांच्या जीवनाचे सूत्र त्यांच्या सामाजिक ध्येयाला अनुरूप असेच होते. त्यांचा स्वत:चा आणि त्यांच्या मुलाचा आंतरजातीय विवाह होता. या घटनेमागे त्यांचा सामाजीक समतेचा व्यापक दृष्टीकोण प्रतीत होतो. विमलाबाईंच्या रूपाने त्यांना ध्येयनिष्ठ सेवाव्रत अशी सहधर्माचारिणी लाभली. डॉ.पंजाबरावांच्या सहवासात विमलाबाईचे जीवनही सेवामय बनले. लौकीक प्रपंच सांभाळून त्यांनी डॉ.पंजाबरावांना आपल्या कार्यात व्यग्र राहण्यासाठी बहुमोल अवसर प्राप्त करून दिला. "सहधर्माचारिणी ही कर्तुत्ववान पुरूषांच्या जीवनातील फार मोठी शक्ती होय." विमलाबाईच्या स्वरूपात ती शक्ती डॉ.पंजाबरावांना मिळाली. या शक्तीलाही त्यांनी समाजसेवाभिमुख बनवून आपल्या जीवनात एकरूप करून सोडले. डॉ.वि.भी.कोलते म्हणतात, "डॉ.पंजाबराव यांचे जीवन असे अद्भूतरम्य आणि स्फर्तिदायक आहे. राष्ट्रातील आणि महाराष्ट्रातील नवीन पिढींच्या समोर ते सदैव असते पाहिजे.

♦ कु. रोहीणी गावंडे
द्वितीय वर्ष वाणिज्य

# मुलगी म्हणून मला समाजाशी बोलायचं

*'जिचे हाती पाळण्याची दोरी।*
*ती जगाला सांभाळी।*
*ऐसी मातेची थोरी।*
*शेकडो गुरूहुनही'।।*

माता म्हणजे 'आई' 'माय' तिची ती ममता, तिचं ते प्रेम, तिचा तो जिव्हाळा तिचा उमाळा काही आगळा वेगळा कुठेही न मिळणारा.

मला तुम्हाला प्रश्न विचारायचा आहे. मला सांगा समाजामध्ये जेवढी आवश्यकता पुरूषाची आहे तेवढीच आवश्यकता स्त्रीची आहे काय? ज्याप्रमाणे पुरूषांना स्वातत्र्य आहे त्याप्रमाणे स्त्रियांना पण स्वातंत्र्य आहे का? काही व्यक्तीचे उत्तर हे हो असेल तर काहींचे नाही असेल. ज्यांचे उत्तर होय आहे त्यांचे अभिनंदन! पण ज्यांचे उत्तर नाही आहे त्यांना मला विचारावेसे वाटते असे कोणते क्षेत्र आहे ज्या क्षेत्रात स्त्रियांना कार्य करण्यास अपवाद आहे.

आपल्या्या भारताला १५ ऑगष्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले आहे पण मला असे वाटते की भारत हा खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य झालाच नाही. कारण की आज भारतामध्ये स्त्री सुरक्षीत नाही. या देशामध्ये स्त्रीचे स्थान काय आहे? लहान असतांना वडीलाच्या आज्ञेखाली, लग्न झाल्यानंतर पतीच्या धाकाखाली आणि वार्धक्यात मुलाच्या मर्जीनुसार स्त्रीचे जगणे सुरू आहे. वर्षानुवर्षे असे हे स्त्रीचे जगणे होते. आज समाजामध्ये स्त्रीला मान नाही, विचार नाही, मत नाही, स्त्रीने नुसते राबायचे, कष्ट करायचे, तरीही स्त्रीवर मालकी पुरूषाची.

त्याला वाटेल तेव्हा तो स्त्रीचा लिलाव करू शकतो. तिला घराबहेर काढू शकतो. आज स्त्री ही कुणाची मुलगी आहे. कुणाची बहीण आहे, कुणाची ती पत्नी आहे, कुणाची आई आहे. अशी कितीतरी नाते ती पार पाडत असते.

स्त्री-पुरूष समानता, स्त्रीमुक्ती, स्त्रीशक्ती, स्त्री-भ्रशणहत्या असे शब्द आज वरच्यावर ऐकू येतात पण आजची वास्तव स्थिती पाहिली की, मनात येते, हे स्वप्न आहे की सत्य? भारतात महिला हक्क आरक्षण कायदा संसदेत मांडण्याचा प्रयत्न करित आहेत. आज अनेक गावातून सरपंचाच्या जागा स्त्रीयांनी जिंकल्या आहेत. पण गावातील पुरूष त्यांना मोकळेपणाने काम करू देत नाहीत. प्रत्यक्ष त्या स्त्रिचा नवराही आपले कर्तव्य सिध्द करीत असतो. पण तेथेही स्त्रीयांचा लैंगीक छळ होतो. आजही हुंडयासाठी स्त्रीची संपूर्ण जगात हत्या केली जाते. एकतर्फी प्रेमातून कितीतरी कोवळया तरूणीची निर्घुणपणे हत्या केली गेली आहे.

आपल्या देशात आजही कितीतरी राज्यामध्ये मुलगी जन्माला येताच तिची हत्या करण्यात येते. मुलगी जन्माला येताच तिला गरम दुधामध्ये टाकून तिची हत्या करतात. आता तर स्त्री गर्भवती असतांनाच तिच्या गर्भाची तपासणी करून हे पहिल्या जाते की, गर्भामध्ये मुलगा आहे की मुलगी आणि मुलगी असेल तर तिला गर्भामध्येच मारून टाकतात. असे एकच वेळा नाही तर मुलगा होईपर्यंत त्या स्त्रीचा गर्भपात वारंवार केला जातो. का बरं या लोकांना मुलगी इतकी नकोशी वाटते म्हणून तिला जन्मालाच येऊ देत नाही आणि एखाद्या घरी चुकूनही मुलगी जन्माला आली तर तिच्या हुंडयाची काळजी लागते. हुंडा ही आजच्या शिक्षणरूपी समाजात असणारी एक जीवघेणी समस्या आहे पण हुंडा घेणे जेवढे वाईट तेवढेच हुंडा देणे हेही चुकीचे आहे.

आज माणासातील मानव हरवला आहे. तो दानव झाला आहे. तो त्याचा 'स्वार्थ' पुर्ण करण्यासाठी लग्नाच्या वेळी वाटेल त्या गोष्टींची मागणी तो वधूच्या वडीलाकडे करतो आणि वधूचे वडील ती मागणी पुर्ण करण्याचे कबुल करतात. स्वत:ला विकून, कर्जबाजारी होऊन वराच्या मागण्या पूर्ण करतात. पण त्या मुलीच्या सासरकडच्या मागण्या हया वाढतच जातात आणि मण लग्नानंतर मुलीचा छळ सुरू होतो. तिला आत्महत्येला प्रवश्त केले जाते व तिची हत्या केली जाते. हे एक महाभयानक सत्य आहे म्हणून हुंडा ही एक भयंकर समस्या आहे.

कुटूंबामध्ये स्त्री-पुरूषसमान आहेत. पत्नीला अर्धांगिनी महणतात मग तिच्याकडून हुंडयाच्या अपेक्षा का? त्यामुळेच तर मुलीचा जन्म ही एक आपत्ती मानली जाते व तिला या जगात येण्यासच प्रतिबंध केला जातो व जगात आलेल्या स्वत:च्या कन्येचा गळा घोटून तिला जगातून हद्दपार केले जाते. सर्व महिला वर्गात या हुंडयाविषयी चीड निर्माण केलीपाहिजे. अनेक वेळा विवाहीत स्त्रीच्या छळाला दुसरी स्त्री म्हणजे तिची सासू व ननंद जबाबदार असते.

आज आपल्या समाजातील स्त्रीयांची स्थिती अतिशय नाजूक आहे. आपल्या समाजातील प्रत्येक स्त्री अरसुरक्षीत आहे. या समाजामध ये दर चार तासाला बलात्काराची केस दर्ज होते. आपल्या समाजामध्ये बलात्कार, छेडखानी, ॲसीड, स्त्री भ्रुणहत्या हे सर्व वाईट कश्त्य आपल्या समाजामध्ये होतें. हे सर्व केव्हा थांबणार आहे?

आज आपल्या समाजामध्ये मुली जीन्स घालतात पण समाजातील लोक असे म्हणतात की मुली जीन्स घालतात म्हणून समाजामध्ये बलात्कार आणि छेळखाणी हे वाईट कश्त्य समाजामध्ये घडत असते. पण मला असे वाटते की, मुलीने जीन्स घालने हे वाईट नाही कारण की तीन वर्षाची मुलगी, चार-पाच वर्षाची मुलगी आणि सत्तर वर्षाची म्हातारी या सर्व जीन्स घालत नाहीत तरी पण त्यांच्यावर बलात्कार होतो. त्या तीन-चार वर्षाच्या मुलींनी अजूनपर्यंत हे जग पूर्णपणे पाहिलेले नसते. त्यांचे हे खेळायचे दिवस असतात पण बलात्कार करणारे लोक त्या चिमुकल्या मुलींना आणि त्या म्हातारीला पण सोडत नाही. त्या चिमुकल्या मुली त्या सत्तर वर्षाच्या म्हाताऱ्या जीन्स घालत नाहीत.

समाजामध्ये मुलाल 'वंशाचा दिवा' म्हणतात आणि मुलीला 'दुसऱ्याचे धन' असे म्हणतात. मुलाल वंशाचा दिवा म्हणने हे योग्य आहे पण दिवा पेटण्यासाठी सुध्दा वातीची गरज असते. मुलामध्ये असे काय आहे? मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये कुठपर्यंत भेदभाव करणार आहात. त्यांना हे कळत कसे नाही की आज मुलगी ही मुलापेक्षा फार पुढे गेली आहे. ती दोन्ही घरचा दिवा लावण्यास समर्थ आहे.

♦ **कु.स्नेहा बोडखे**

तृतीय वर्ष कला

# स्त्री जन्माला नकार नको

"बेटीया तो है लम्हां खुशीका।
बेटीया है तो रोशन जहॉं है।
ये जमींभी है और आसमॉं भी।
है वजुद इन्हीसे इल्सानों का।
बेटीया तो है लम्हा खुशीका।।

इनसे इनकी अदाये न छिनो।
इनसे इनकी सदाये न छिनो।
हक इन्हें भी तो है जिंदगी का।
बेटीया तो है लम्हा खुशीका।।

मानवी जीवनात स्त्रीचेमहत्व अनन्य साधारण आहे. कुटुंबव्यवस्थेचा कणा स्त्रीला मानले जाते. स्त्रीच तर पुरूष आणि स्त्रीची जननी असते. पुरातन काळापासून स्त्रीला देवाचा दर्जा दिला जातो. आई ही पश्थ्वीवरील दैवत मानले जाते. परंतू या जननीला जन्माआधीच गर्भामध्ये मारून टाकण्यात येते. स्त्रीच्या गर्भाचे गर्भजलपरिक्षण करून गर्भामधील भश्ण हे मुलगी असेल तर त्या निर्दोष मुलीला या जगामध्ये श्वास घेण्याआधीच तिची गर्भामध्ये हत्या केली जाते. स्त्रीभश्णहत्या करणे कायद्याने गुन्हा असला तरीही अवैध रितीने स्त्रीयांचे गर्भजल परिक्षण होते. यासाठी डॉक्टर खुप जास्त मोबदला घेतात. वर्तमानपत्रामध्ये अशा डॉक्टरांना पकडण्याचे वश्त्त आपल्याला पहायला मिळते.

भारतात स्त्रीजन्म नाकारला जातो. पुरूष जन्माचे स्वागत केले जाते. मुलगा जन्माला आला पाहिजे अशी सर्वसाधारण सर्वांचीच इच्छा असते. मुलगा वंशाचा दिवा असतो आणि मुलगी परक्याचे धन या विचारप्रक्रियेत चालणाऱ्या समाजाकडून स्त्रीभश्णहत्येची प्रकरणे घडतात. मुलगा आपला वंश पुढे नेईल, आपल्या संपत्तीची राखण करेल आपल्या वश्ध्द काळात आपला सांभाळ करेल अशी समजुत असते आणि मुलगी म्हटले की चुल आणि मुल त्यातही हुंडापध्दती आणि अनेक त्रास तिला सहन करावे लागतात. एकुणच गुलामगिरी, असुरक्षीतता, शिक्षणाचा अभाव, निस्तेज जीवन जगायला स्त्रीयांना भाग पाडले जाते. हळू हळू परिस्थिती बदलत आहे. आज स्त्री शिक्षणाला प्राधान्य दिले जात आहे. स्त्रियांना आपल्या अस्तीत्वाची जाणीव झाली आहे. ती परिस्थितीवर मात करून पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करत आहे. पारंम्परिकरित्या पुरूषांची समजली जाणारी क्षेत्र सुध दा आता ती काबीज करत आहे.

मुली स्वत:च्या पायावर उभे राहीपर्यंत व पुढेही तिला सन्मान, प्रोत्साहन व हिम्मत तीच्या पालकांकडून व समाजाकडून मिळाल्यास स्त्रीजीवनाचा उत्कर्ष घडून येईल. त्याची सुरूवात मात्र आपण आपल्या घरापासून केली पाहिजे. भविष्यात आपणाला कोण मदत करतील किंवा आपले पालनपोषण कोण करतील आपल्याकडे कोण लक्ष देतील हे आजच सांगता येणार नाही परंतु ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही की आई-बाबांची काळजी मुलगी ज्या आस्थेने घेते ती काळजी मुलगा घेत नाही.

लोकांची मुलगा-मुलगी बाबतची माणसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे. मुलगा असो वा मुलगी ते अपत्य असते. असे जोपर्यंत समजले जाणार नाही, तोपर्यंत स्त्रीभश्णहत्या कितीही कठोर कायदे करूनही थांबवता येणार नाही. बदलत्या काळात व बदलत्या वैधानिक प्रगतीमुळे माणुस बदलत गेला आहे. जनगणनेनुसार स्त्री व पुरूष यांचे प्रमाण पाहिले तर आपल्या लक्षात येईल काही वर्षापुर्वी जन्माच्या आधी बाळाच्या लिंग निदान परिक्षनाचा सर्रास वापर करण्यात आला होता. गर्भात मुलगी असेल तर गर्भपात करून घेणे अटळ असे. मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या कमी झाली तर आपल्या मुलांना राखी कोण बांधणार आणि मुलांची लग्ण

कसे होणार हयाचा विचार स्त्रीभ्रूणहत्या करणाऱ्या लोकांनी केला पाहिजे. आपल्या समाजात पहिली मुलगी झाली की नाक मुरडणारी माणसेच अनेक आहेत. तर त्या उलट काही लोक आनंद साजरा करणारी देखील आहेत. पण वाईट हयाच गोष्टीचे वाटते की, आपल्या समाजातील काही लोकांना स्त्रीभ्रूणहत्या करू नये हे कधी समजणार.

सर्व समाजाने एकत्र येऊन स्त्रीभ्रूणहत्येविरूध्द चळवळ उभारली पाहिजे. कोणीही गर्भ निदान केले आहे असे लक्षात येताच अशा लोकांची व डॉक्टरांची माहिती पोलीसांना येताच अशा लोकांची व डॉक्टरांची माहिती पोलीसांना दिली पाहिजे. मुलींसाठी सरकार ज्या योजना राबवीत आहे त्याबद्दल जाणून घेऊन त्याची माहिती इतरांना पटवून दिली पाहिजे. जेव्हा लोकांना समजेल की मुलगी हे एक ओझ नसून मानवजातीला आधार देणारा महत्वाचा पाया आहे. तेव्हा स्त्रीभ्रूणहत्या नक्कीच थांबेल.

आज स्त्रीया डॉक्टर, अभियंता, वैमानिक, न्यायाधिश, राज्यकर्त्या, वकील अशा अनेक भुमीकेत यशस्वीपणे वाटचाल करतांना दिसतात. भारताच्या इंदिरा गांधी यांनी ११ वर्षे भारताचे पंतप्रधानपद अतिशय यशस्वीरित्या भूषविले, भारताच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील तसेच लोकसभेच्या अध्यक्ष सुमित्रा महाजन अशी अनेक उदाहरणे स्त्री शक्तीचे देता येतात.

अशा या महान स्त्रीजन्माचे स्वागत आणि सन्मान आपण केला पाहिजे. स्त्री जन्माला नकार नको तर तिचे स्वागत करून तिला सन्मानाने सुरक्षीत आणि उज्वल जीवन प्रदान करणे आपले नैतिक कर्तव्य आहे.

स्त्री सशक्त असेल तर समाज सशक्त बनेल. स्त्रीयांना प्रतिष्ठा देऊन त्यांच्यातील कला गुणांना वाव दिला पाहिजे. यामुळे त्यांचे जीवन स्वावलंबी बनवण्यासाठी स्त्रीयांनीही संघटीत होऊन स्त्रीयांचे हक्क मिळवणे गरजेचे आहे. मुलगा व मुलगी यामध्ये भेदभाव करू नका कारण **'मुलापेक्षा मुलगी बरी। प्रकाश देते दोन्ही घरी!'**

♦ कु.पुजा शिवरकार
तृतीय वर्ष कला

# जीवन एक शाळा

आजवर अनेकांनी जीवनाच्या अनेक व्याख्या केल्या आहेत. कुणाला जीवन हा दोन घडींचा डाव वाटतो तर कुणाला जीवन ही एक रंगभूमी वाटते. कुणाला जीवन म्हणजे क्रिकेटचा खेळ वाटतो. कुणी जीवनाकडे हास्यांचे कारंजे म्हणून पाहतात तर कुणाला त्या जीवनात दुःखाची खाई दिसते. जीवन ही एक मरणाची मालिका वाटते तर काहींना जीवन हे केवळ एक मशगजळ वाटते. 'व्यक्ती तितक्या प्रकश्ती' या उक्तीनुसार जीवनाकडे पाहण्याचा प्रत्येकाचा वेगवेगळा दश्ष्टिकोन असतो.

जीवनाची अशीच एक व्याख्या करतांना 'जीवन ही एक शाळा आहे' ही व्याख्या मोठी अर्थपूर्ण व मार्मीक वाटते. खरेच जीवन ही एक शाळा आहे. या शाळेत आपण नित्यनवीन काहीतरी शिकत असतो. या शाळेची सुरूवात जन्मापासून होते व शाळा सोडल्याचा दाखला आपल्या मृत्युच्या दाखल्यासोबत मिळतो. म्हणून तर कवी नारायण सुर्वे म्हणतात -

'दुःख झेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, हे मी या जीवनरूपी शाळेतच शिकलो'. जीवनाच्या या शाळेत आपण अनेक गोष्टी शिकतो. काही वर्षांनी मागे वळून पाहिले तर आपण पूर्वी किती अपरिपक्व, पोरकट होतो हे लक्षात येते. बालपणी आपल्याला जगाची ओळख नव्हती. जगाच्या शाळेतील या बालवर्गात असतांना सारे जग सुंदर, निष्पाप वाटत असते पण जीवनाच्या वरच्या शाळेचा विद्यार्थी झाल्यावर लक्षात येते की, दिसते तसे नसते आणि म्हणून जग फसते. हळूहळू आपल्या सभोवारच्या व्यक्तींचे सर्व डावपेच उलगडू लागतात.

जीवनाचा वास्तवीक अर्थ शोधतांना बालपण संपते आणि स्वतःच्या पायावर उभे रहावे लागते. म्हणजेच जीवनाच्या शाळेतील उच्च वर्गात आपण दाखल होतो, तेव्हा पहिली गोष्ट लक्षात येते ती ही की, जीवन ही केवळ फुलबाग नाही. या फुलबागेत फुलाबरोबर काटे देखील आहेत. फुले मिळवायची असतील तर कधी-कधी काट्यांनी घायाळ होण्याची तयारी ठेवावी लागते.

जीवनाच्या या शाळेत आपला अभ्यास आपल्यालाच करावा लागतो. या स्वयंअध्ययनातून आपला विकास घडत असतो. अनुभव हा आपला येथील गुरू असतो. कधी तो पाठीवर शाबासकीची थाप देतो तर कधी तो क्षुल्लक प्रमादासाठी जबर शिक्षाही ठोठावतो. पण या शिक्षेतून जीवनाला एक नवा अर्थ प्राप्त होतो. नवा रंग लाभतो. जीवनाच्या या शाळेच्या शिक्षेतूनच जीवनाला एक महान मंत्र मिळतो, तो म्हणजे अपयशाने खचू नका, यशाचा मार्ग निर्धारपूर्वक चढा. यश हाच यशाचा खरा मंत्र आहे.

जीवनाच्या शाळेत आपणाला लाभलेला सर्वात मोठा गुरू म्हणजे निसर्ग! निसर्गात सतत पडझड होते, तरी निसर्ग सदैव प्रसन्न असते. चिरतरूण असते. जीवनात पडझड होणारच, तरीही सदैव प्रसन्न चित्त राहा, असे तो सुचवितो. निसर्ग हा शिक्षक स्वतःच्या आचरणातून आपणाला अनेक गोष्टी शिकवतो. नित्यनेमाने उगवणारे चंद्र, सुर्य आणि तारे तसेच अखंडपणे सुरू असणारे ॠतुचक्र आपल्याला नियमीतपणाचे महत्व सांगतात. सुर्य, नद्या, वृक्ष आपणाला परोपकारी वृत्तीची शिकवण देतात. धरीत्रीपासून आपल्याला क्षमाशीलता शिकता येते.

अशा या जीवनाच्या शाळेतील शिक्षणाची सांगता जीवनाच्या सांगतेबरोबरच होत असते. या शाळेचा निरोप घेणे आणि जगाचा निरोप घेणे या गोष्टी एकाच वेळी घडत असतात. अशी ही जीवनाची आगळी वेगळी एक शाळा आहे. त्या शाळेत यशस्वी होण्याकरिता सतत शिकत रहा.

♦ **कु.प्रतिक्षा शेंडे**
तृतीय वर्ष कला

# महर्षी कर्वे एक कर्ते सुधारक

विद्येचे माहेरघर म्हणून मानली गेलेली पुण्यनगरी. वेळ सकाळची, रस्ता अगदी गजबजलेला. या मार्गावर पाच-सहा शाळा, चार महाविद्यालये आणि एक विद्यापीठही आहे. असा हा पुण्यशिल पथ आहे तो 'कर्वे पथ'. एका थोर पुण्यात्म्याच्या पदस्पर्शाने पुनीत झालेला. या विचाराने मन भुतकाळात झेपावले तेव्हा नदीपलीकडच्या पुण्याबाहेर. काटयाकुटयांनी भरलेली, खाचखळगे असलेली ती निर्जन वाट तुडवत रोज एक कृश, धिरगंभीर वामनमुर्ती त्या मार्गाने जात-येत असे. ती मुर्ती म्हणजेच महर्षि अण्णासाहेब उर्फ धोंडो केशव कर्वे.

अपार कष्ट सोसुन उच्च शिक्षण घेतलेल्या अण्णांना त्या काळात सरकारी नोकरी सहज मिळाली असती. त्याद्वारे भरभक्कम पगाराची निश्चीत म्हातारपणाची सोय, शिवाय मान सन्मान देखील मिळाला असता. अण्णांना यातील कोणत्याच गोष्टीचा मोह नव्हता. कारण फार वेगळया बंडखोर विचारांनी त्यांना झपाटले होते.

पहिल्या भारतीय स्वातंत्र्य युध्दाच्या मुहूर्तावर १८ एप्रील, १८५८ ला अण्णांचा या क्रांतीकारकाचा - मुरूडसारख्या आडवळणी गावात जन्म झाला. गरिबीत जन्मलेल्या या धोंडुने आईकडून सोसीकपणाचा वारसा घेतला होता. म्हणूनच अनंत अडथळे आले तरी खचुन न जाता अण्णांनी आपले शिक्षण पुर्ण केले. एकदा तर लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसाठी ते १७३ कि.मी. अंतर पायी चालत गेले पण आवश्यक वय पुर्ण नसल्याची अडचण आल्यामुळे त्यांना त्या परीक्षेला बसता आले नाही. नोकरी, शिकवण्या या मार्गांनी द्रव्यार्जन करत त्यांनी एम.ए. पर्यंतचा उभ्यास पूर्ण केला.

शिक्षण पूर्ण होण्या आधीच अण्णांनी आपले पुढील ध्येय निश्चीत केले होते. भोवतालचा अज्ञानाचा अंधकार व विशेषत: महिलांवर होणारा अन्याय यांनी त्यांना अस्वस्थ केले पण अण्णांनी कुठे भाषणबाजी केली नाही. शब्दांचे डोंगर उभारण्यापेक्षा मुकपणे प्रत्यक्ष कृती करणेच अण्णांना पसंत होते. कोणतीही गोष्ट दुसऱ्याला सांगण्यापुर्वी अण्णा प्रथम ती स्वत: कृतीत आणत. त्यांची पहिली पत्नी दिवंगत झाल्यावर अण्णांनी दुसरा विवाह केला तो एका बालविधवेशी. पाऊणशे वर्षापुर्वीच्या महाराष्ट्राला ही गोष्ट रूचणारी नव्हती. अण्णांनी समाजाचा प्रचंड विरोध पत्करला आणि 'बाया' नावाच्या विकेशा विधवेला आपली पत्नी म्हणून स्विकारले.

'बाया'शी पुनर्विवाह करून आपण एका विधवा स्त्रीला तीच्या दु:खातुन बाहेर काढले खरे, पण आपल्या समाजातील इतर हजारो दुर्दैवी स्त्रीयांचे काय? असा अण्णांना प्रश्न पडला. या स्त्रीयांच्या जीवनातील अंधार नाहिसा केलाच पाहिजे असा अण्णांनी निर्धार केला आणि त्यासाठी ते ज्ञानदीप हाती घेऊन पुढे सरसावले. त्यासाठी त्यांनी हिंगण्याचा ओसाड माळ निवडला. त्या माळराणावर एक झोपडी थाटली. पुढे हयाच झोपडीत अनाथ बालीकाश्रम काढला. त्यासाठी एकटया अण्णांनी लाखो रूपयांच्या देणग्या मिळवल्या. त्यांना सुरूवातीला फक्त 'बाया'ची साथ होती. देशातील अनाथ महिलांचा विचार करतांना या दांपत्याला स्वत:च्या संसाराचा विचार करायला फुरसत राहिली नाही. सर्व अभागी महिलांच्या संसारातच त्यांचा संसार सामावला होता.

अण्णांच्या कार्याचा व्याप वाढत होता. स्त्री शिक्षणाची आवश्यकता आता सर्वांना पडली होती. १९०७ साली अण्णांनी 'महिला विद्यापीठ' स्थापन केले. याचवेळी अण्णांना जपानमधील स्त्रीयांकरीता असलेल्या 'नरूसे विद्यापीठाची' माहिती मिळाली आणि त्यांना स्त्रीयांच्या उध्दरांचा नवा मार्ग सापडला.

स्त्रीयांचे कार्यक्षेत्र वेगळे असल्याचे लक्षात घेऊन अण्णांनी स्त्रीयांसाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. त्यांनी संकल्प सोडला आणि मदतीचे अनेक हात पुढे येऊ लागले. या समाज सुधारकाचे वैशिष्टये असे की त्यांनी मान सन्मान, नावलौकीक याची कध ी अपेक्षाच केली नाही. निरलसपणे ते आपल्या कार्यात मग्न राहिले. महिला विद्यापीठ नावारूपास आले तसा हा स्थितप्रज्ञ पुरूष निर्लेपणे त्यापासून दुर झाला. सरकारने त्यांना 'भारतरत्न' प्रदान करून गौरवले. या गौरवातून त्या किताबाचाच सन्मान झाला. अण्णांचे इस्पीत आता पुर्ण झाले होते. यातच अण्णा धन्य झाले होते.

◆ कु.सोनल शेलोने
तृतीय वर्ष कला

# बेरोजगारी एक समस्या

बेरोजगारी ही प्रचंड स्वरूपाची समस्या आहे. ही समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र हयावर सरकारचे काहीच लक्ष नाही. दिवसेंदिवस देशामध्ये बेरोजगारांची समस्या वाढत आहे आणि यामध्ये सर्वात जास्त सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या आहे. एकतर भारतामध्ये अजूनही इंग्रजांनी निर्माण केलेली व नोकर निर्माण करणारी शिक्षण प्रणाली आहे. तसेच आपला भारत हा खेडयापाडयांचा देश आहे येथील मुख्य उद्योग शेती हाच आहे आणि अशा शेतीप्रधान देशातील शेतकऱ्यांची मुले व मुली खुप काटकसर करून शिकतात तेव्हा यामध्ये कुठेतरी आपल्या पारंपारीक शेतीपलीकडे काही करण्याचा किंवा कुठेतरी अधिकारी बनविण्याचा उद्देश असतो. मात्र केंद्रामध्ये असलेले व सत्ता हाती असलेले स्वार्थी बनल्यामुळे देशाचे हाल होत आहेत व बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र हा मुद्दा जनतेच्या मनात उतरला नाही पाहिजे म्हणून सत्ताधारी नवनवीन मुद्दे आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. नुकत्याच आलेल्या NSSU (National Sample Serve Office) च्या आकडयानुसार ६% पेक्षा जास्त बेरोजगारीची टक्केवारी आहे. पिरिऑडिक लेबर फोर्स सर्वे (PLFS) च्या अनुसार वर्ष २०१७-१८ मध्ये बेरोजगारी दर ६.१% आहे. तसेच जास्तीत जास्त बेरोजगारी नोटाबंदीच्या नंतर निर्माण झाली आहे. तसेच सरकारी आकडयांनुसार देशात साडे चार करोड बेरोजगार आहेत.

अशा परिस्थितीत भारताला सुपरपॉवर बनविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या डोळ्यांना काय उत्तर द्यावे हेच कळत नाही. अशाप्रकारे बेरोजगारीची तलवार गळ्यापर्यंत आलयावरही आपण कित्येक दिवस या विषयावर डोळेझाक करणार किंवा कित्येक दिवस आपण झोपेत राहणार हया गोष्टींची सर्वांनाच किमान आतातरी चिंता असायला हवी. तसेच जर अशीच परिस्थिती कायम असली तर येणाऱ्या पिढीचे काही खरे नाही.

● **बेरोजगारीची कारणे :** बेरोजगारी देशामध्ये निर्माण होण्यासाठी कित्येक कारणे आहेत त्यापैकी काही कारणे खालील प्रमाणे.

**१) अत्याधुनिक यंत्राचा वापर :-** तंत्रज्ञानाच्या या युगात यंत्राचा मोठया प्रमाणावर उपयोग केला जात आहे. एक मशिनच कित्येक लोकांचे काम सांभाळत आहे. त्यामुळे हजारो हात निकामी होऊ लागले आहे. यामुळेही मोठया प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे.

**२) स्त्रियांचा सहभाग :-** आधुनिक काळात वा आजच्या काळात स्त्रियाही कमविण्यासाठी घराबाहेर पडताहेत. पुर्वी स्त्रिया मात्र फक्त गशहिणी म्हणूनच काम करत असत. मात्र आज स्त्रियांचा सहभाग वाढल्याने त्यांचीही बेरोजगारांमध्ये गणना होऊ लागली आहे. अशाप्रकारे कित्येक कारणे आहेत परंतु आपण कारणापेक्षा स्थिती किती भयानक बनलेली आहे व बेरोजगारी किती प्रमाणात वाढली आहे याचे गांभीर्य लक्षात घेतले पाहिजे.

**३) तांत्रिक शिक्षणाचा अभाव :-** आपल्या देशामध्ये जास्तीत जास्त शिक्षण प्रणाली ही फक्त सरकारी नोकर निर्माण करणारी आहे. त्यामुळे फक्त नोकरच उत्पन्न होत आहेत. तसेच तांत्रिक शिक्षणाचा फार मोठया प्रमाणावर अभाव आहे. त्यामुळे हया शिक्षण प्रणालीचा शेतकरी व कुशल कामगारांना काहीच फायदा होतांना दिसत नाही.

**४) सरकारची ढिलाई :-** देशामध्ये कित्येक सरकारी पदे रिकामी आहेत. परंतु तरीही सरकार नोकरीसाठी फिरणाऱ्या युवकांवर तिथे जाण्याची संधी मिळत नाही. एकतर देशामध्ये भरती लवकर निघत नाही. तसेच भरती निघाली तरीही ही भरती प्रक्रीया पूर्ण होत नाही. अशामुळे भरती निघुनही ती पुर्णत्वास येत नाही म्हणुनच बेरोजगारीची समस्या तशीच कायम उभी राहते. भारतामध्ये एक भरती प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी ४ ते ५ वर्ष लागतात.

● **भरतीसाठी विलंब :** सरकारी पदांमध्ये भरतीसाठी कशाप्रकारे विलंब लावल्या जातो तसेच परिस्थिती किती गंभर स्वरूपाची लक्षात घेण्यासाठी NDTV हया बातम्यांच्या चॅनलवरून संग्रहीत केलील काही उदाहरणे खालील प्रमाणे.

आक्टोबर २०१६ मध्ये स्टॉफ सिलेक्शन कमीशनच्या ६७०० पदांसाठी जागा निघाल्या. त्या परिक्षेमध्ये ३० लक्षहून अधिक युवक-युवती सामील झाल्या. हयावरून ही परीक्षा किती कठीन स्वरूपाची असेल हे लक्षात येते. असो या परिक्षेचा अंतिम निकाल आला तो फेब्रुवारी २०१८ मध्ये. कित्येक विभागांमध्ये भरती झाली पण 'मिलट्री इंजिनियरिंग सर्व्हिस' मध्ये ५०० हुन अधिक उत्तीर्णांची कार्यरती झाली आहे. हे विद्यार्थी रात्रंदिवस संबंधीत कार्यालयाला भेट देत असतात. पत्र लिहीतात, फोन करतात, व्टिट् करतात मात्र काहीच निष्पन्न होत नाही. तेव्हा यांनी या परिक्षेसाठी जी दोन वर्षे मेहनत केली वा गमावले त्याचे काय? २८ जानेवारी २०१७ रोजी अमि शाह यांनी उत्तर प्रदेशमध्ये येणाऱ्या ५ वर्षामध्ये ७० लक्ष रोजगात उत्तर प्रदेशच्या जनतेसाठी उपलब्ध करणार त्यापैकी ९०% रोजगार उत्तर प्रदेशच्या जनतेला होणार असे वक्तव्य केले होते. परंतु आज रोजी मात्र २०१९ हे वर्ष सुरू झालेले आहे. तेव्हा उत्तर प्रदेशमधील किती युवकांना रोजगार मिळाला आहे. एकदा याचा तपशील घ्यायला हवा.

डिसेंबर २०१६ रोजी १२४६० एवढया पदांची शिक्षक भर्ती निघाली. त्यानंतर ३० मार्च २०१७ रोजी नियुक्तीपत्र भेटावयाचे होते. परंतु तेव्हापर्यंत अखिलेश यादव यांची सरकार किंवा सत्ता गेली व BJP हया पक्षाची सरकार सत्तारूढ झाली. निविन सरकारने समिक्षा करण्याचे प्रतिपादन केले परंतु समिक्षेच्या नावाखाली एक वर्ष गेले. त्यानंतर धिर सुटायला लागला व विद्यार्थी हालचाल करू लागले अशाप्रकारे आज आपला देश बेरोजगारीच्या समस्येत कसा फसला आहे हे दिसुन येते.

अशा प्रकारे हया अहवाल लेखनाच्या आधारे मी ही समस्या आपल्यापुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. या विषयावर किती लिहावे हा प्रश्न पडतो पण मात्र हया विषयावर लिहायची नव्हे तर उठून जागे होण्याची गरज निर्माण झाली आहे. हा आवाज मनातून निघतो आहे. तेव्हा हाच प्रश्न आपण उठून जागे होण्यासाठी तयार व्हावे अशी इच्छा आहे.

♦ **अब्दुल फारूख अब्दुल खलीक**
तृतीय वर्ष कला

# हुंडा : एक सामाजिक समस्या

हुंडा ही आजच्या समाजाला ग्रासणारी एक जीवघेणी समस्या आहे. उत्तरेपासून दक्षीणेपर्यंत, पुर्वेपासुन पश्चिमेपर्यंत, पुरातन काळापासून आजपर्यंत हुंड्याची ही अमानुष अघोरी रूढी चालु आहे. रामायण, महाभारतासारख्या महान ग्रंथातुनही हुंडयाचा उल्लेख आहे. इतकी ही प्राचीण रूढी आहे. हुंडा देणे हेही चुक आहे.

प्राचीन काळी विवाह म्हणजे कन्यादान असे मानले जात असे. त्यामुळे मुलीची सासरी पाठवणी करतांना तिच्याबरोबर बऱ्याचशा गोष्टी दिल्या जात. परंतु हा सर्व मामला खुशीचा असे. त्यात कुठेही अडवणूक नसे. आई वडीलांची संपत्ती वारसा हक्कान मुलाकडे जात असे. तीत मुलीचा हक्क नसे ही कमतरता दुर करण्यासाठी लग्नाच्या वेळी हुंडा दिला जाई. हा एक प्रकारे आई वडीलांच्या संपत्तीतील मुलीचा वाटा असे. आज मात्र या गोष्टीला पूर्ण विकश्त वळण लागले आहे. मुलांचे लग्न म्हणजे घबाड मिळवणे अशी चुकीची समजुत झाली आहे. माणसातील माणुस हरवला आहे. तो दानव झाला आहे. त्याच्यातील स्वार्थ भयंकर बोकाळला आहे. मग लग्नाच्या वेळी वाटेल त्या गोष्टींची मागणी केली जाते. अडलेले वधुपिते त्या गोष्टी कबुल करतात. स्वत:चा जमीन जुमला विकुन, कर्जबाजारी होऊन बऱ्याच मागण्या पूर्ण करतात. पण त्या भस्मासुराची भूक वाढतच जाते. मग लग्नानंतर मुलीचा छळ सुरू होतो. तिला आत्महत्येला प्रवश्त केले जाते वा तिची हत्या केली जाते. तो नराधम पुन्हा बोहल्यावर उभा राहण्यास तयार म्हणजे पुन्हा नवे घबाड!

हुंडा ही एक भयंकर समस्या आहे. हुंडा घेणे म्हणजे स्वत:ला विकणे. आजकाल मुलींनी आपली पात्रता सिध्द केली आहे. अलीकडे अनेक घरात असे दिसून येते की, लग्न करून येणारी मुलगी घराला पोसते. घराच्या उत्पन्नात भर घालते. अडीअडचणीत समर्थपणे ती घराला सावरते असे आहे. तर मग स्त्रीला भार का समजावे? तिच्याकडूनच हुंड्याची अपेक्षा का?

कुटुंबात स्त्री-पुरूष समान असतात. पत्नीला अर्धांगी म्हटले जाते. पण प्रत्यक्षात मात्र पुरूषाला श्रेष्ठ समजतात व स्त्रीला कनिष्ठ समजतात. समाजाच्या प्रत्येक व्यवहारात हेच वास्तव स्पष्टपणे दिसते. हुंडा हे या वास्तवाचे एक रूप आहे. या हुंडयामुळे कित्येकदा कुटुंबाच्या कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. त्यामुळे मुलींचा जन्म ही एक आपत्ती मानली जाते. तिला या जगात येण्यासच प्रतीबंध केला जातो वा जगात आलेल्या स्वत:च्या कन्येचा गळा घोटून तिला जगातून हद्दपार केले जाते. म्हणून प्रत्येक सुज्ञ मानसाने या हुंडयाला हद्दपार केले पाहीजे.

हुंडयाला विरोध करणारा कायदा सरकारने केला आहे. पण या कायद्याला कोणी धुप घालत नाही. आजही प्रचंड पिळवणुक चालु आहे. या घातक समस्येविरूध्द काही सामाजीक स्त्री संस्था आजही काम करत आहेत पण ते प्रयत्न पुरेसे नाहीत. त्यासाठी मोठी क्रांती व्हायला हवी. समाजातील सर्व घटक त्यासाठी एकत्र यायला हवेत. समाजातील तळागाळापर्यंत प्रबोधनाचे कार्य पोहोचायला हवे.

हुंडयाच्या प्रथेचा नाश करण्यासाठी समाजात स्त्री-पुरूष समानतेची दश्ष्टी निर्माण केली पाहीजे. केवळ हुंडा या एका बाबींचाच विचार करता येणार नाही. समाजाच्या विचारधारेच्या मुळाशी आपल्याला जावे लागेल. स्त्री ही पुरूषांसारखीच माणुस आहे. तिला पुरूषांसारख्याच सुखदु:खाच्या भावना असतात. इच्छा-आकांक्षा असतात. स्वत:चे आयुष्य घडवण्याचा पुरूषांइतकाच तिला अधिकार आहे. ही दश्ष्टी समाजात रूजवली पाहीजे. प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आदर केला गेला पाहीजे. किंबहुना, समाजातील सर्व पातळीवरील विषमता नष्ट होईल तेव्हाच हुंडयाची प्रथा आपोआप नाहीशी होईल.

♦ **कु.साखराबाई पिसाळ**
तृतीय वर्ष कला

# ध्यानसिध्द : स्वामी विवेकानंद

ध्यान म्हणजे सर्वकाही अंतीम सत्यात आत्म्यात विलीन करून टाकण्याचा अभ्यास होय पुथ्वी आपमध्ये, आप तेजामध्ये, तेज वायुमध्ये, वायु आकाशामध्ये, आकारा मनामोह विलीन होईल आणि मनसुध्दा शेवटी लुप्त होईल सर्व काही आत्माच आहे.

ध्यान कल्पनेच्या प्रक्रियेने साध्य होते. महाभूतांच्या शुध्दीकरणाच्या साऱ्या प्रक्रिया करा - एका भूताला दुसऱ्यात विलीन करा. त्याला त्याहुनही सुक्ष्म अशा भूतात विलीन करा. याप्रमाणे क्रमाने सर्व भूते मनात विलीन करा व मन आत्म्यात विलीन करा आणि मन शेवटी आत्माच उरेल म्हणूनच भगवान श्रीरामकृष्ण स्वामी विवेकानंदाचा ध्यानसिध्द म्हणून उल्लेख करीत असत.

स्वामी विवेकानंदाचे जीवन म्हणजे एक अद्भुत घटना होय. ते एक आदर्श योगी आणि सन्यासी होते. ते एक आचार्य आणि नेता होते आणि तपस्वी होते. कर्मयोगी आणि तत्वज्ञानी होते ते उच्च दर्जाचे भकत होते. शिवाय सर्वोच्च ज्ञानही त्यांना होते. ते मानवसेवेसाठी समर्पित झाले होते. ते एक संगीत तज्ञ होते, उच्च दर्जाचे वक्ता होते आणि पट्टीचे तालिमपटही होते. विवेकानंदामध्ये कोणासही पूर्ण पुरूषाचा आभास प्राप्त होत असे. त्याचे गुरू श्रीरामकश्ष्ण त्यांच्या संबंधात म्हणाले होते 'नरेंद्र हा ज्ञानसिध्द महापुरूष आहे तो मायेच्या बंधनाचे आपल्या ज्ञानखडगाने तुकडे तुकडे करून टाकतो. अनिर्वचनीय माया त्याला कधीच आपल्या कह्यात आणू शकत नाही.

विवेकानंदाचा जन्म १२ जानेवारी १८६३ ला कलकत्यात झाला. कोलकत्यांच्या ज्या दत्त कुटूंबात नरेंद्रनाथांचा जन्म झाला ते कुटूंब ऐश्वर्यसंपन्नता, दानशुरपणा, विद्वता व पांडित्य आणि वश्त्ती यासाठी सुविख्यात होते. नरेंद्रनाथांचे वडील श्रीयुत विश्वनाथ आणि आई भुवनेश्वरीदेवी. वडीलांच्या तुलनेत नरेंद्रची आई भुवनेश्वरीदेवी ह्यांचे व्यक्तीमत्व एका वेगळया सायात घडलेले होते. विवेकानंद बालपणापासूनच ते असामान्य कर्तत्वशक्ती असलेले एक बालक होते. तरीही त्यांची ध्यानधारणेकडे असलेली उपजत प्रवश्त्ती त्यांच्या बाल्यावस्त्तेतच दश्ष्टीगोचर होत आहे. बालकत्व सर्वसाधारण खेळ खेळतांना तो ध्यान करणाऱ्याचा खेळही खेळत असे.

एके दिवशी नरेंद्र समवयस्क मित्राबरोबर खेळत होता. खेळता खेळता घराच्या तिसऱ्या मजल्यावरील शिवाच्या मुर्तीसमोर ध्यानस्त बसण्याचा खेळ सुरू झाला. थोडया वेळाने एका मुलाला तिथे एक नाग दिसला तो ओरडला सारेजन दरवाजा उघडून पळून गेले. परंतु नरेंद्र तसाच निश्चलपणे ध्यानमग्न बसून होता थोडया वेळाने नागाने आपली फडा सावरली आणि तो निघून गेला. नंतर तो शोधूनही सापडला नाही. ही सारी गोष्ट ऐकल्यावर नरेंद्र म्हणाला 'मला तर काहीच कळले नाही मी अवर्णणीय अशा आनंदात होतो'. सुरूवातीच्या एका भेटीमध्ये रामकृष्णांनी विवेकानंदाला अपूर्व स्पर्श केला होता. ज्यामुळे त्यांच्या मनातून द्वैतबोध पुर्णपणे नाहीसा होऊन त्यांना अलौकीक अशा बोधाचा अल्पसा अनुभव आला होता. साधारणपणे जिवनाचे अंतिम उद्दीष्ट असलेल्या समाध ीच्या प्राप्तीसाठी गुरू शिष्याला मदत करीत असतो. परंतु स्वामी विवेकानंदाच्या गुरूंना आपल्या शिष्याकडून अधिक काही अपेक्षा होत्या. एकदा नरूदेनाथ याच वेदान्तोक सर्वोच्च अनुभूतीच्या लाभासाठी तळमळत होते. संपूर्ण सहा वर्ष त्यांनी गुरूबरोबर, स्वत:च्या मनाबरोबर कोणअविराम, घनघोर युध्द केले होते. ते जेव्हा श्रीरामकृष्णांकडे आले तेव्हा श्रीरामकृष्णांनी प्रेमभराने त्यांच्याकडे पाहून म्हटले, "नरेंद्र काय हवयं तुला? योग्य संधी आलेली बघून नरेंद्रनाथांनी उत्तर दिले मी शुकदेवाप्रमाणे सर्वदा निर्वीकल्प समाधीच्या सहाय्याने चिदानंदसागरात डुबून राहू इच्छितो." श्रीरामकृष्णांच्या चेहऱ्यावर अमळ अधिरता दिसू लागली ते म्हणाले, "पुन्हा पुन्हा ही गोष्ट उच्चारायला लाजही वटत नाही तुला? कुठे योग्य काळी एखाद्या विशाल वटवृक्षासमान वाढून शेकडो, हजारो लोकांना शांतीची सावली देतील, ते दिले सोडून, अन स्वत:च्या मुक्तीसाठीच सारखे तडफड? इतके क्षुद्र ध्येय तुझे?" श्रीरामकृष्णांचे विशाल हृदय पाहून नरेंद्रनाथांच्या डोळयातून धडधड अश्रु वाहू लागले.

ह्याच काळातील आणखी एक प्रसंगी श्रीराम कश्ष्णाचे एक गश्ही शिष्य गिरीशचंद्र घोष यांनी सांगीतला आहे. एके दिवशी विवेकानंद व गिरीशचंद्र घोष ध्यान करण्यासाठी एका झाडाखाली बसले होते. तिथे इतके काही डास होते की, त्यामुळे गिरीशच्या ध्यानात व्यत्यय

येऊ लागला आणि त्यांचे चित्त विचलीत झाले त्यांनी डोळे उघडून पाहिले तेव्हा त्यांना हे बघून आश्चर्य वाटले की, विवेकानंदाचे शरीर डासांनी इतके आच्छादीत करून टाकले होते की, ते जणू एखाद्या काळ्या घोंगडीने झाकले आहे असे वाटावे. परंतु विवेकानंदांना मात्र या गोष्टीची मुळीच जाणीव नव्हती आणि ते सामान्य बोधावर आले तेव्हा त्यांना ह्याची आठवण देखील नव्हती. हिमालयात भ्रमण करतांना एक दिवस ते एका निर्झराच्या बाजुला असलेल्या पिंपळवृक्षाखाली ध्यान करण्यास बसले तिथे त्यांना मनुष्याच्या ब्रम्हांडाशी लहान प्रतिकृती आहे. ब्रम्हाडामध्ये ज्या कशाचे अस्तित्व आहे त्या साऱ्यांचे अस्तित्व देहामध्ये सुध्दा आहे आणि संपुर्ण ब्रम्हांड एका अणुमध्ये व्यवस्थित असलेले आढळून येऊ शकते. ह्याची अनुभूती देखील त्यांना झाली. त्यांनी ह्या अनुभवाची नोंद एका वहीमध्ये करून ठेवली आणि आपले गुरूबंधू आणि सहचर स्वामी अखंडानंद यांना तो सांगीतला तो असा "आज जीवनातील अत्यंत कठीण समस्येंपैकी एका समस्येचे उत्तर मला मिळाले. मला उलगडून दाखवण्यात आले की ब्रम्हांड (समष्टी) आणि पिंडाड (व्यष्टी) म्हणजे अणू अथवा मानव एकाच सुत्राद्वारे संचालित होतात."

३१ मे १८९३ ला विवेकानंदांनी शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत हिंदुधर्माचे प्रतिनीधी म्हणून भाग घेण्याकरिता आपला प्रवास आरंभ केला. परंतु त्याचा संदेश इतका सार्वजनिक होता की एका निरीक्षकाने त्याबद्दल असा अभिप्राय व्यक्त केला की विवेकानंद जगातील सर्वच धर्माचे प्रतिनीधी होते. त्यांनी वेदान्ताचा उच्चतम संदेश उद्‌घोषीत केला. 'अमश्तमय शांतीचे भागीदार, पवित्र आणि पुर्णत्व असलेल्या आत्म्यांनो, तुम्ही ईश्वराचे संतान आहात, तुम्ही आणि पापी! मानवाला असे संबोधने हेच महापाप होय, मनुष्याच्या विशुद्ध स्वरूपावरील तो एक मिथ्या कलंकरोप मात्र होय. नंतरच्या तीन वर्षात त्यांनी अमेरिकेत आणि युरोपीय देशात खुप प्रवास केला आणि तरिही पश्चिमी देशातील व्यक्त जिवन त्यांच्या ध्यानात बाधा निर्माण करू शकले नाही. विवेकानंदांमध्ये आपल्याला कर्म आणि ध्यान यांचे दोन परस्परविरूध्द प्रवाह परस्परांमध्ये अडथळा न आनता सुसंवादीतपणेवाहत असलेले आढळून येतात.

भारतीय कला आणि स्थापत्यशास्त्र याद्वारा अध्यात्मिक अनुभूतीची परमोच्च अवस्था भगवान बुध्दांच्या ध्यानमुर्तीमध्ये चित्रीत करण्यात आली आहे. राज महान आदर्श स्वामीजींची शिष्या मेरी फंकीच्या आठवणीतून दुर्गोचर होऊ शकते. स्वामीजींच्या सहस्त्रद्विपोद्यानातील मुक्कामाचा अखेरचा दिवस अतिशय अद्‌भूत व मोलाचा होता. ख्रिस्तीन व मी अशा आम्ही दोघींना फिरावयास चलण्याची त्यांनी विनंती केली, कारण आज फक्त आम्हा दोघींना आपला वेळ देण्याची त्यांची इच्छा होती. सुमारे अर्धा मैलावर असलेल्या एका टेकडीवर आम्ही गेलो. सर्वत्र दाट झाडी व नीरव एकान्त होता. सरते शेवटी त्यांनी एक ठेंगणेसे झाड पसंत केले व त्याच्या पसरलेल्या फांद्याखाली आम्ही बसलो ते आता काहीतरी बोलतील अशी आमची अपेक्षा होती परंतु ते अचानकपणे म्हणाले आता आपण ध्यान करू या. बृध्ददेव ज्याप्रमाणे बोधीवृक्षाखाली बसले होते त्याचप्रमाणे आपणही बसू या असे आम्हाला भासले नंतर मेघगर्ज तुफान वादळास सुरूवात झाली व सपाटून जलवृष्टी झाली. त्यांचे तिकडे मुळीच लक्ष नव्हते. मी आपली छत्री उघडून त्यांच्या डोक्यावर धरली व पावसापासून त्यांचे यथाशक्य संरक्षण केले. ते ध्यानात पुर्णपणे लीन झाले होते त्यामुळे इतर कशाचेही त्यांना भान नव्हते.

श्रीरामकश्ष्ण म्हणाले होते की, विवेकानंद हे साधारण पुरूष नव्हते तर ते एक नित्यसिध्द जन्मतः च पुर्णत्व असलेले, ईश्वरकोटी अथवा ईश्वराचे विशेष दुत असून दिव्य कार्य पुर्ण करण्यास भुतलावर जन्मले होते ह्याचा आपण विसर पडू देऊ नये. विवेकानंद म्हणाले आहेत 'जोपर्यंत हे विश्व जाणणार नाही की ते ईश्वराशी अभिन्न आहे तोपर्यंत मी मानव जातीला त्यासाठी सर्वत्र प्रेरित करेन. 'आपल्या संपुर्ण जिवनात त्यांनी एकाग्रतेचा इतका अभ्यास केला की, ती त्यांच्या जीवनात अभिन्न अंगच बनुन गेली. पश्चिमी देशात त्यांना हा मौल्यवान सवयीवर ताबा ठेवावा लागला. भगिनी निवेदिता आपल्याला सांगतात "एका प्रसंगी न्युयार्कमधील ध्यानवर्गात ध्यान शिकवितांना वर्ग संपल्यावर असे आढळून आले की, त्यांना बाह्यबोधावर आणणे शक्य नाही आणि एकेक करून आलेले सर्वजन तिथून शांतपणे निघून गेले. परंतु काय घडले हे जेव्हा त्यांना कळले तेव्हा ते अतिशय खजील झाले आणि त्याची पुनरावश्ती होऊ देण्याची जोखीम त्यांनी कधीही पत्करली नाही. एक किंवा दोन व्यक्तीसह निर्जनी ध्यान करतांना ते एखादे असे नाम मंत्र सांगून ठेवायचे की ज्यायोगे त्यांना सामान्य बोधावस्थेत आणता येईल.

श्रीरामकृष्णांनी भविष्यवाणी केली होती की, आपले कार्य समाप्त झाल्यावर जेव्हा आपण खरोखर कोण आणि काय आहोत हे नरेंदला कळून येईल तेव्हा तो निर्वीकल्प समाधीत लीन होईल. एक दिवस बेलुर मणत जेव्हा त्यांच्या गुरूंकडून त्यांना सहज विचारले स्वामीजी तुम्ही कोण आहात हे तुम्ही जाणले आहात काय? तेव्हा ते उत्तरले, "होय मी आता जाणतो आहे". स्वामीजींच्या उत्तराने त्या गुरूबंधुसमवेत चुप रहावे लागले.


विवेकानंदाच्या ह्या जगातील आगमन एवढेच त्यांचे प्रस्थान सुध्दा आश्चर्यकारक होते. पंचाग पाहिल्यानंतर त्यांनी आपल्या लीलासमाप्तीकरिता एक शुभ दिवस निश्चीत केला. तो दिवस होता ४ जुलै १९०२ त्यांनी त्या दिवशी सकाळी तीन तास ध्यान केले आणि तिसऱ्या प्रहरी तरूण सन्याशांकरिता संस्कृत, व्याकरण आणि वेदान्ताचा वर्ग घेतला. त्यानंतर ते आपल्या एका गुरूबंधुसमवेत लांबवर फिरून आले.

स्वामी विवेकानंद आपल्या एका सेवक शिष्याशी जे अखेरचे शब्द बोलले ते असे मी तुला हाक देईपर्यंत वाट पहा आणि ध्यान कर. महासमाधीची अवस्था त्यांना नऊ वाजून दहा मिनीटानी प्राप्त झाली. स्वामी विवेकानंदांनी ते एकोणचाळीस वर्ष, पाच महिने आणि चोवीस दिवसांचे झाल्यावर देह सोडला अशा रितीने त्यांनी जणू स्वत:चीच मी चाळीस वर्षाचा होईपर्यंत जगणार नाही ही भविष्यवाणी खरी केली.

"अतिवापराने जीर्ण झालेल्या वस्त्राप्रमाणे मला माझे पार्थिव शरीर टाकुण देणे जास्त श्रेयस्कर वाटू शकेल परंतू मी कार्य करण्यापासून कदापीही थांबणार नाही. जोपर्यंत संपूर्ण जगात आपण ईश्वरापासून अभिन्न असल्याचा अनुभव येत नाही तोपर्यंत मी सर्वत्र स्त्रीपुरूषांना प्रेरणा देत राहीन."

♦ कु. योगीता आढे
एम.ए.भाग.१ राज्यशास्त्र

# काव्य विभाग



# शब्द

बोलतांना जरा सांभाळून कृकृकृ शब्दाला तलवारीपेक्षा धार असत।
फरक एवढाच की, तलवारीने मान तर शब्दाने मन कापले जात।

जरी तलवारीच्या जखमेतुन रक्त आणि शब्दांच्या जखमेतुन अश्रु येत असले,
तरी दोघांपासून होणारी वेदना सारखीच असते।
म्हणुन म्हणते शब्द जरा सांभाळुन। शब्दाला तलवारीपेक्षा धार असते।।

शब्द माणसाला जोडतात, आणि शब्दच माणसाला तोडतात।
हे शब्दच आहेत, जे कधी रामायण तर कधी महाभारत रचतात।।

एकाच शब्दावर सर्वस्व अवलंबुन असते।
एकाच शब्दावर हसणे आणि एकाच शब्दावर रडणे अवलंबुन असते।
म्हणुन म्हणते शब्द जरा सांभाळुन। शब्दाला तलवारीपेक्षा धार असते।।

♦ कु.विद्या बोपुलकार

तृतीय वर्ष कला

# घर

घर हे घर असतं।
नात्याच बंधन असतं।
बंधनातही ओलावा असतं।
म्हणुनच घर हे घर असतं।।

घर हे घर असतं।
पक्षांचं असो वा गुरांचं।
की असो माणसांचं।
चार भिंतीचं उभ असतं।।

घर हे घर असतं।
जिवनाच रहस्य असतं।
संस्काराचं केंद्र असतं।
यशाचं कारण असतं।।

घर हे घर असतं।
वक्षासारखं बहरत असतं।
फळांना आधार देत असतं।
मुळांना मात्र जखडून ठेवतं।।
म्हणुनच घर हे घर असतं।।

घर हे घर असतं।
घरात असावी लागतात,
घराला घरपण देणारी माणसं।
तेव्हाच घराचा अर्थ कळतो।
घर हे घर असतं।।

♦ कु.पुनम गायगोले
तृतीय वर्ष कला

# चुक

जगाकडून शिकायचे तर
चुक मात्र होणार
माणुस तो तर चुकतोच
चुक म्हणजे ती सुधारायला हवी
सुधारतांना पर्याय दोन
खरा किंवा खोटा।।

कोणताही असो! जखम मात्र होणार
जखम कृकृ! परत तिलाच ठोकर लागणार
ठोकर लागली म्हणजे ती वाढत जाणार
वाढली तर अंगात मुरत राहणार
मुरली ती, त्यात पू झाला
घडा घडा वाहत आला
वेदना वाढत गेल्या
नश्वर शरिर वेदनाच त्या
जाळून गेल्या .......... !

♦ **कु.सुवर्णा गावंडे**
एम.ए.भाग-२ मराठी

# जीवन

सुख आणि दु:खाच्या
आडव्या उभ्या धाग्यांनी
विणलेला सुंदर रूमाल
म्हणजे जीवन होय।
कारण सुखाबरोबर दु:ख
पचविणे म्हणजे जीवन होय।।

जीवन हे ओजळीत
भरलेल्या पाण्याप्रमाणे आहे.
बिदूतून सिंधू निर्माण करण्याची
शक्ती त्यात आहे .............

♦ कु.प्रिती देवळे
तृतीय वर्ष कला

## फक्त तू खचू नकोस

एक डाव हरला तरी।
त्यात काय एवढ?
कुणीतरी जिंकलंच की।
हे ही नसे थोड।
संधी मिळेल तुलाही।
लगेच हिरमसु नकोस।
आयुष्य खुप सुंदर आह।
फक्त तू खचू नकोस।।
सुर्य रोजच उगवतो।
त्याच नव्या तेजाने।।
रोज मावळतीला जातो।
रोजच्याच नेमाने।
येणे जाणे रितच इथली।
हे तू विसरू नकोस।
आयुष्य खुप सुंदर आहे।
फक्त तू खचू नकोस।।
प्रेम तुझ्यावर करणारे
कितीतरी लोक आहेत।
तुझ्यासाठी जोडणारे।
खुप सारे हात आहेत।
अरे अशाच आपल्यांसाठी।
तूही थोडं हसून बघ
आयुष्य खुप सुंदर आहे।
फक्त तू खचू नकोस।।
सामर्थ्य आहे हातात जर।
स्वप्ने डोळयात घेऊन चल।
परिस्थितीशी भिडवून छाती।
दोन हात करत चल।
विजय तुझाच असेल।
तेव्हा मागे वळून बघु नकोस।
आयुष्य खुप सुंदर आहे।
फक्त तू खचू नकोस।।

♦ **विश्वजित तायडे**
तृतीय वर्ष विज्ञान

# मराठी भाषेचे महत्व मान्यवरांच्या काव्यपंक्तीतून

माझी माय सरसोती।
मले शिकवते बोली।
लेक बहिनाच्या मनी।
किती गुपीतं पेरली।।

**बहिणाबाई चौधरी**

माझ्या मराठाचि बोले कौतुकें।
परि अमृतातेही पैजा जिंके।
ऐसि अक्षरे रसिकें। मिळविन।।

**संत ज्ञानेश्वर**

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी।
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी।
धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी।
एवढ्या जगात माय मानतो मराठी।।

**मायबोली-सुरेश भट**

साय मी खाते मराठीच्या दुधाची।
मी कुणाचा उंबरा झिजऊ कशाला।।

**सुरेश भट**

# संत लेखक, कवी व विचारवंतांच्या लेखणीतून डॉ.भाऊसाहेबांचा गुणगौरव

ज्ञानदीप हा विद्यार्थ्यांचा वऱ्हाडचा हरपला,
अरे हा थोर पुरूष लोपला.
शासनात बसुनी शेतकरी जगविला,
कश्षकांचा मेळा दिल्लीला भरविला.
ज्ञानदीप हा विद्यार्थ्यांचा वऱ्हाडचा हरपला,
अरे हा थोर पुरूष लोपला.
तुकडया महणे श्री पंजाबराव किर्तीला पावला,
विसरी ना भारत तव शक्तीला.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**

पंजाबराव नावाचे तेजाब जन्मले होते,
जखमांच्या संगे अमुचे जोडले तयाने नाते
इंधनापरी तो जळला, चंदनापरी तो झिजला,
ज्ञानांची टाके ठिणगी अग्नी न अजूनही विरला.

**मधुकर केचे**

शतकाचे साहून शाप जीम ने रापली होती,
आलास थेंब होऊनी तू अशा अभाग्यांसाठी

**राम शेवाळकर**

"संघर्ष आणि सन्मान, करूणा आणि कल्याण, समता आणि समश्ध्दी, शिक्षण आणि विज्ञान, त्याग आणि सेवा, वेग आणि दिशा, कश्षक आणि शोषित समाज, व्यापक कार्यसश्ष्टी आणि प्रखर विचार सश्ष्टी यांची ओजस्वी - तेजस्वी कहाणी म्हणजेच डॉ.पंजाबराव जीवन कहाणी."

**सुधाकर मोहोड**

उधळून प्राणांची फुले महाराष्ट्र तुजला मुजरा करी,
वाहून तनमनधन तुला पंजाब चरणांना धरी,
गायी यशोगीते तुझी वंगीय अमश्त वैखरी,
गंगेचिया लाटांतुनी उठती तुझे नामध्वनी

**सुरेश भट**

ठसे पाऊलांचे त्यांच्या इथे देव व्हावे,
रोज पाळण्यांनी त्यांचे दैवगीत गावे.
जगी वावरावे त्यांचे पांघरूण शेले,
देशकार्य करूनी गेले तेच धन्य झाले.

**सुधाकर देशमुख**

पापळचा गर्जता केसरी पंडीत पंजाब,
दिल्लीच्या त्या दरबाराचे हादरले खांब.

**पा.श्रा.गोरे**

सक्तीच्या प्राथमिक शिक्षणावर भाऊसाहेबांनी त्यावेळी आपले लक्ष केंद्रित केले पण ते केवळ साधन होते. मुख्य साध्य शेतकऱ्यांचा उध्दार आणि म्हणून शेतकरी हाच त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता. शेतकऱ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे, तिकडे त्यांची प्रवृत्ती नसेल तर ती निर्माण केली पाहिजे, हे लक्षात घेऊन त्यांनी आपल्या अंगीकृत कार्यासाठी आरंभीची पावले टाकली.

शेतकऱ्यांसाठी नव्हे तर सर्वांसाठी त्यांनी शिक्षण सक्तीचे केले. इतकेच नव्हे तर 'शेतकरी संघ' नावाची संस्था निर्माण केली. ही गोष्ट आजच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची होय.

**डॉ.वि.भि.कोलते**

## Physical Education Department : Meritorious Students



अविनाश धुवे, बी.ए.-३
५५ किलो वजनगटात
भारोत्तोलन स्पर्धेत कलर



कु. मनिषा भारसाकळे, बी.ए.-३
५२ किलो वजनटात
शक्तीत्तोलन स्पर्धेत कलर




कु. निशा ढोक, बी.कॉम.-२
४७ किलो वजनटात
शक्तीत्तोलन स्पर्धेत कलर



शुभम राऊत, वर्ग-१२ (कला)
राज्यस्तरीय भालाफेक स्पर्धा,
कराड, जि. सातारा येथे सहभाग




J.U.O. V. H. Dohale
NCC Meritorious Student
T.S.C.-2018



NSS Student Mr. Sagar Lapurkar with
Hon'ble Vice-President of India in R.D. Parade at New Delhi




Principal Dr. A. L. Kulat and College Teaching,
Non-teaching Staff




Principal Dr. A. L. Kulat, Teaching, Non-teaching Staff
& N.S.S. Unit Serving in "Pani Foundation"




College N.S.S. Unit constructed "Water Conservation Tank" in
special camp at adopted village Lamkani



College Students Performing "Folk Dance" in
Annual Gathering in the college




Hon'ble Shri Harshvardhan P. Deshmukh addressing at
Dr. Panjabrao Deshmukh Birth Anniversary in the college



Hon'ble V.C. Dr. Murlidhar Chandekar inaugurating
Newly Constructed Commerce Building



'सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी व्याख्यानमाला' श्रीमती विद्यालक्ष्मीबाई मेटकर भाषण करताना




कवितालेखन कार्यशाळा- मा. कुलगुरू मुरलीधर चांदेकर भाषण करताना




कवितालेखन कार्यशाळा- मा. अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख, भाषण करताना




कवितालेखन कार्यशाळा- कविवर्य विठ्ठल वाघ भाषण करताना




कवितालेखन कार्यशाळा- मा. कुलगुरू मुरलीधर चांदेकर,
मा. अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख व मान्यवर मंडळी



Hon'ble Dr. Devanand Atkare felicitating students at
Degree Distribution Ceremony in the college